रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १६०
www.ramprahar.com

बुधवार, २७ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना संरक्षण/२

मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांकडून पनवेल स्थानकाची पाहणी/६

स्क्वॉशपटू दुर्गा पारधीची राष्ट्रीय पातळीवर निवड/८

## युट्युबवरही पंतप्रधान मोदींचा जागतिक पातळीवर डंका



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्या अधिकृत यूट्युब चॅनेलवर तब्बल २० दशलक्ष सबस्क्राइबर्स मिळवणारे पहिले जागतिक नेते ठरले आहेत. नरेंद्र मोदी यांच्या युट्युब चॅनेलवरच नव्हे; तर सर्वच सोशल मीडियावर विविध प्रकारचे व्हिडीओ पहायला मिळतात. यापूर्वीही पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर आपली दमदार छाप पाडली होती आणि आता या नव्या विक्रमासह मोदी जगभरातील सर्व राजकारण्यांच्या पुढे पोहचले आहेत. केवळ सबस्क्राइबर्स नाहीत; तर त्यांच्या व्हिडीओला मिळणाऱ्या एकूण व्ह्यूजची संख्यासुद्धा सर्व नेत्यांहून अधिक आहे. प्राप्त माहितीनुसार पंतप्रधान मोदी यांच्या चॅनेलवर आजपर्यंत ४.५ अब्ज (४५० कोटी) व्ह्यूज मिळाले आहेत तसेच त्यांच्या युट्युब चॅनेलवर अंदाजे २३ हजार व्हिडीओ असून यूट्युबच्या पलीकडेही त्यांचा प्रभाव इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅपसारख्या इतर प्लॅटफॉर्मवर विस्तारला आहे.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'मानद डॉक्टरेट' प्रदान

### जपानमधील कोयासन विद्यापीठाकडून पदवी मिळवणारे पहिले भारतीय




**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जपानच्या कोयासन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. मुंबई विद्यापीठातील दीक्षांत सभागृहात मंगळवारी (दि.२६) पदवी प्रदान सोहळा झाला. या विद्यापीठाकडून अशी पदवी मिळणारे उपमुख्यमंत्री फडणवीस हे पहिले भारतीय ठरले आहेत.

कोयासन विद्यापीठाने १२० वर्षांच्या इतिहासात प्रथमच मानद डॉक्टरेट पदवी देण्याचा निर्णय घेतला. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, जलयुक्त शिवारच्या माध्यमातून जलसंधारणाच्या क्षेत्रात आणि सामाजिक समानतेसाठी केलेले कार्य यासाठी ही मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. कोयासन विद्यापीठाचे प्रा. इन्युई रुनिन, वाकायामा प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे संचालक यामाशिता योशियो, जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत डॉ. फुकाहोरी यासुकाता कार्यक्रमास उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस ऑगस्ट २०२३मध्ये जपान दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी कोयासन विद्यापीठाला भेट दिली. तेव्हा डीन सोएदा सॅन यांनी फडणवीस यांना डॉक्टरेट देण्याचे जाहीर केले होते.

> कोयासान विद्यापीठ १२०० वर्ष जुने आहे. त्या विद्यापीठातून मला पदवी मिळणे माझ्यासाठी भाग्य आहे. आपण नेहमी म्हणतो जगाला युद्ध नको बुद्ध हवा. गौतम बुद्धांचे विचार दोन देशांना जवळ आणतात. मी दीक्षाभूमीच्या शहरातून येतो याचा मला अभिमान आहे. ही डॉक्टरेट मी जनतेला समर्पित करतो. हे कार्य मी करू शकलो, कारण राज्यातील जनतेचे आशीर्वाद सोबत होते आणि वरिष्ठांची, सहकाऱ्यांची साथ होती.
>
> **–देवेंद्र फडणवीस**, उपमुख्यमंत्री

### देशाच्या विकासाची महाराष्ट्र गुरूकिल्ली

*या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पूर नियंत्रणासाठी आपण जपानकडून विकसित तंत्रज्ञान आणत आहोत. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र नंबर वन आहे. आता स्टार्टअपची कॅपिटल हैदराबाद, बंगळुरू नाही; तर महाराष्ट्र आहे. महाराष्ट्र देशाच्या विकासाची गुरूकिल्ली आहे. हे असमित ताकदीचे राज्य असून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नवभारताचा मार्ग महाराष्ट्रातून जातो.*

## माथेरानमध्ये पुन्हा ई-रिक्षा धावली!



**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान या पर्यटनस्थळी पर्यावरणपूरक ई-रिक्षाचा दुसरा पायलट प्रकल्प सुरू झाला आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी आणि प्रशासक राहुल इंगळे यांनी मंगळवारी (दि.२६) दस्तुरी नाका येथे ई-रिक्षांना हिरवा झेंडा दाखवला. दिगंबर चंदने यांनी दुसऱ्या पायलट प्रकल्पाचे पहिले प्रवासी होण्याचा मान मिळविला.

सर्वोच्च न्यायालयाने मे २०२२मध्ये माथेरानमध्ये ई-रिक्षाचा पायलट प्रकल्प राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ५ डिसेंबर २०२२ ते ४ मार्च २०23 या कालावधीत माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षाचा पायलट प्रकल्प राबविण्यात आला, पण त्रुटींअभावी तो तीन महिन्यांनंतर बंद पडला. नवीन पायलट प्रकल्प वर्षभर सुरू राहणार आहे. सध्या सहा रिक्षा आल्या असून त्यांची संख्या वाढविण्याची मागणी होत आहे.

> *हातरिक्षाचालकांची अमानवीय प्रथेतून मुक्तता व्हावी. त्यांना आरोग्यदायी व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळावी यासाठी गेल्या १२ वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. या पायलट प्रकल्पात हातरिक्षा ओढणाऱ्यांना ई-रिक्षा चालविण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे.*
>
> ***–सुनील शिंदे,** ई-रिक्षा याचिकाकर्ते, माथेरान*



**पनवेल : दि रयत सेवक को ऑपरेटिव्ह बँकेच्या वाशी-नवी मुंबई शाखेवर संतोष पांडुरंग ठाकरे यांची स्वीकृत संचालक म्हणून निवड झाली आहे. याबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, कामगार नेते सुरेश पाटील, रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, बीएमएसचे रायगड जिल्हा संघटक डी.पी. सोनवणे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत आदी उपस्थित होते.**

## मुंबईतील भाऊच्या धक्क्यावर दोघांचा मृत्यू

**मुंबई** : भाऊचा धक्का येथे मच्छीमार नौकेत गुदमरून दोघांचा मृत्यू झाला असून अन्य चौघांवर जे.जे. रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अंजनीपुत्र नौका पहाटे २ वाजता धक्क्यावर आणण्यात आली. बोटीतील मच्छी काढण्यासाठी सकाळी ११च्या सुमारास एक कामगार उतरला असता तो बेशुद्ध पडला. यानंतर दुसऱ्याने धाव घेतली असता तोदेखील बेशुद्ध पडला. एकूण सहाजण या वेळी बेशुद्ध पडले होते. या सर्वांना जे.जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर बी. श्रीनिवास आनंद यादव (३५) व नागा डॉन संजय (बोट मालक) यांना मयत घोषित केले. सुरेश निमुना मेकला (२८) व्हेंटिलेटरवर असून इतर तिघांची प्रकृती स्थिर आहे. या प्रकरणी पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली असून तपास सुरू आहे.

## निवडक

### युद्धनौका आयएनएस इम्फाळ नौदलाच्या ताफ्यात दाखल

**मुंबई** : विशाखापट्टनम वर्गातील तिसरी युद्धनौका आयएनएस इम्फाळ मंगळवारी (दि.२६) नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. मुंबईतील नौदलाच्या तळावर झालेल्या शानदार कार्यक्रमात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत इम्फाळ युद्धनौकेवर पहिल्यांदाच नौदलाचा ध्वज सन्मानपूर्वक फडकवण्यात आला.

### फ्रान्सने रोखून धरलेले 'ते' विमान मुंबईत परतले

**मुंबई** : मानवी तस्करीच्या संशयावरून फ्रान्सने रोखलेले विमान तब्बल चार दिवसांनंतर मंगळवारी (दि.२६) मुंबईत परतले. या विमानाने २५ डिसेंबरला पॅरिसच्या वाट्री विमानतळातून उड्डाण घेतले होते. विमानातून मानवी तस्करी होत असल्याचे कळताच उड्डाण रोखण्यात आले. यानंतर या प्रकरणी दोघांना अटकही करण्यात आली होती.

## दिनदर्शिका प्रकाशन



**पनवेल : अधिराज सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून माजी पं.स.सदस्य निलेश पाटील व सहकाऱ्यांनी नवीन वर्षाची दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत आदी उपस्थित होते.**

## मागासवर्ग आयोगाची आज पुण्यात बैठक

**पुणे : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाची बुधवारी (दि.२७) पुण्यात महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. राणीच्या बागेतील व्हीव्हीआयपी विश्रामगृहात सकाळी ११.३० वाजता ही बैठक होणार असून या वेळी मराठा आरक्षणाच्या विषयावर चर्चा होणार असल्याची माहिती आहे.

न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्यानंतरची ही दुसरी बैठक असेल. या बैठकीत मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे.

## भाजप युवा मोर्चाची उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या आदेशानुसार युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली आहे.

भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड सरचिटणीसपदी दिनेश खानावकर, अभिषेक भोपी; उपाध्यक्षपदी अ‍ॅड. चिन्मय समेळ, निलेश भगत, जगदिश आगिवले, अ‍ॅड. शिवानी घरत, गौरव कांडपिळे, अजय मोरे; सचिवपदी विवेक होन, परेश पाटील, शुभ पाटील, हेमंत भाटिया, नितेश घुगे, कोषाध्यक्षपदी मिनेश मसणे; कार्यकारिणी सदस्य म्हणून फुलाजी ठाकूर, रवींद्र अभिमने, डॉ. सुमित मिश्रा, प्रज्योत कल्याणकर, करण सोनावणे, प्रणय मोरे, भूषण जळे, शशिकांत इंगळे, सुरज परदेशी, शिवगोपाल तोमर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी विभाग संयोजकपदी आशिष कडू, युवा वॉरियर्स संयोजक देवांशू प्रभाळे, युवती प्रमुख संयोजक रवीना आर्य, आत्मनिर्भर भारत अभियान संयोजक अक्षय पाटील, सोशल मीडिया संयोजक हेन्री जोस आणि मन की बात, सरल अ‍ॅप, नमो अ‍ॅप, नमो राजदूत संयोजक म्हणून ऋषिकेश साबळे यांची नियुक्ती झाली आहे.

# 'थर्टीफर्स्ट'च्या पार्श्वभूमीवर पोलीसही लागले तयारीला!

**अलिबाग : प्रतिनिधी**

नववर्षाच्या आगमनास काही दिवस उरले आहेत. सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे तितक्याच जल्लोषात स्वागत करण्यासाठी सर्वजण सज्ज होत असताना रायगड पोलीस सर्तक झाले आहेत. मागील चार महिन्यांत रायगड जिल्ह्यात ३४३ कोटी रुपयांचे अमली पदार्थ सापडले आहेत. काही साठा अद्याप लपवून ठेवण्यात आल्याची दाट शक्यता असून त्याची थर्टीफर्स्टच्या निमित्ताने विक्री होऊ नये यासाठी रायगड पोलीस नजर ठेवून आहेत. नववर्षाचे स्वागत आनंदात आणि शांततेत व्हावे यासाठी पोलिसांचा प्रयत्न आहे.

सध्या पोलिसांकडून हॉटेल, लॉज, कॉटेज चालक यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. अमली पदार्थांची विक्री होत असल्यास तत्काळ माहिती देण्याचे आवाहन पोलिसांकडून केले जात आहे. यासाठी रायगड पोलीस अधिक्षकांच्या कार्यक्षेत्रात असलेली सर्व पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे. नाताळ आणि त्यानंतर नववर्षाच्या स्वागतासाठी येथील हॉटेल, लॉज, कॉटेजेस यांची



शंभर टक्के बुकींग पंधरा दिवसांपूर्वीच झालेली आहे. राहण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाची ओळख पटल्याशिवाय परवानगी देऊ नये, अशा सूचना देण्यात येत आहेत. जिल्ह्यात येणाऱ्या प्रत्येकाला आधारकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, वाहनांची कागदपत्रे बाळगणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील प्रमुख मार्गांवर १२ तपासणी नाके तयार करण्यात येणार असून तिथे कडक तपासणी केली जाणार असल्याची माहिती रायगडचे अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी दिली.

नववर्षाचे उत्साहात स्वागत करण्यास सर्वजण सज्ज होत आहेत. या दरम्यान मोठ्या प्रमाणात नागरिक घराबाहेर पडणार असून उत्साहाचा परमोच्च अनुभव गाठण्यासाठी मद्य, अमली पदार्थांचा तितक्याच प्रमाणात वापरही होण्याची शक्यता असल्याने रायगड पोलीस विभाग अलर्ट मोडवर आहे. थर्टीफर्स्टच्या निमित्ताने येथील पर्यटक व्यावसायिक जय्यत तयारी करीत असताना ड्रग्स तस्करही आपले जाळे विस्तारीत आहेत. पूर्वी कर्जत, लोणावळापर्यंत मर्यादित असलेला पर्यटनाच्या नावाखालील अमली पदार्थांचा व्यापार आता रेवदंडा, किहीम, कोलाड परिसर, श्रीवर्धन या ठिकाणीही पसरत असल्याच्या शक्यतेने रायगड पोलिसांनी उपाययोजना सुरू केल्या आहेत.

### आडमार्गावरील फार्महाऊसवर नजर

रेव्ह पार्ट्यांसाठी बदनाम असलेल्या कर्जत, खालापूर येथील फार्महाऊसवर पोलिसांची विशेष नजर असणार आहे. यासाठी नवी मुंबई पोलिसांचेही सहकार्य घेतले जाणार आहे. या तालुक्यांत यापूर्वी अनेकदा रेव्ह पार्ट्यांवर छापे टाकण्यात आलेले आहेत. मुंबईपासून जवळच असल्याने तरुण, तरुणी येथे येणे पसंत करतात. कर्जत, खालापूरबरोबरच रेव्ह पार्ट्यांसाठी आता कोलाड, रेवदंडा, किहीम, दिवेआगर येथील नवनव्या फार्महाऊसपर्यंत या व्यवसायाचा विस्तार झाल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिक करू लागले आहेत. त्या ठिकाणीही पोलीस गुप्त माहितीचे जाळे विस्तारत आहेत.

> *थर्टीफर्स्टचा आनंद लुटण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. शांततेत तो सर्वांना उपभोगता आला पाहिजे यासाठी रायगड पोलीस मेहनत घेत आहेत. ड्रग्जपुरवठा रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर काम केले जात असून कोणालाही याची माहिती मिळाल्यास पोलिसांशी संपर्क साधावा.*
>
> ***–अतुल झेंडे,** अपर पोलीस अधीक्षक, रायगड*

## ५०व्या राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनाचे उद्घाटन

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित ५०व्या राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी (दि.२६) राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते करण्यात आले. हे प्रदर्शन ३० डिसेंबरपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू राहणार आहे.

विविध संस्था आणि देशभरातील विद्यार्थ्यांच्या सहभागाद्वारे हे केवळ विज्ञान प्रदर्शन न राहता विज्ञानाचा उत्सव झाला आहे. या प्रदर्शनाला अनेक विद्यार्थी भेट देणार असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोन दर्शविणारे हे वादळ प्रत्येक घरापर्यंत पोहचेल, असा विश्वास राज्यपाल बैस यांनी या वेळी व्यक्त केला.



या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, एनसीईआरटीचे सहसंचालक डॉ. श्रीधर श्रीवास्तव, शालेय शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक अमोल येडगे आदी उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी राज्यपालांनी विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या निर्मिती आणि शोधकवृत्तीला दाद दिली.

सुवर्ण महोत्सवी प्रदर्शनाचा मुख्य विषय तंत्रज्ञान आणि खेळणी असा आहे. ३१ राज्यांतील १७३ बाल वैज्ञानिकांनी आपल्या प्रतिकृतीसह या प्रदर्शनात सहभाग घेतला आहे. दररोज १० हजार विद्यार्थी, शिक्षक, पालक प्रदर्शनाला भेट देतील.

# साहेब, तुम्ही आमचा विश्वास सार्थ ठरवला!

## एमपीएससी उमेदवारांनी मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

**मुंबई : प्रतिनिधी**

साहेब, तुम्ही आशेचा किरण होता आणि तुम्ही हा विश्वास सार्थ ठरवला. साहेब हा विजय केवळ तुमच्यामुळेच आणि तुमच्या प्रयत्नांमुळेच झाला आहे. यामुळे आमच्या कुटुंबामध्ये आनंद, समाधान परतले आहे, अशा शब्दांमध्ये एमपीएससी व अन्य भरती प्रक्रियेतील उमेदवारांनी मंगळवारी (दि. २६) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले. मुख्यमंत्री शिंदे यांनीही या भावनांचा स्वीकार करतानाच, या सर्व उमेदवारांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



आर्थिक दुर्बल-ईडब्ल्युएसच्या आरक्षणाबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्या पुढाकारामुळे राज्य सरकारने उच्च न्यायालयात प्रभावी बाजू मांडली. त्यामुळे उच्च न्यायालयाने आर्थिक दुर्बल घटकांचे आरक्षण मान्य केल्याने मराठा समाजासह अन्य विविध भरती प्रक्रियांमध्ये रखडलेल्या शेकडो उमेदवारांचा भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. या पार्श्वभूमीवर या उमेदवारांनी मुख्यमंत्री शिंदे यांची वर्षा शासकीय निवासस्थानी भेट घेऊन आभार मानले.

मराठा समाजाचे ५ मे २०२१ रोजी आरक्षण रद्द झाल्यानंतर राज्यसरकारने राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) च्या १२ जाहिराती तसेच राज्यातील इतरही सरळसेवा भरतीत ईडब्ल्यूएस आरक्षणाचे लाभ मराठा समाजाला देण्याचे धोरण राबवले होते. हे धोरण महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने २ फेब्रुवारी २०२३ रोजी रद्द केल्याने २३ डिसेंबर २०२०चा शासन निर्णय तसेच ३१ मे २०२१च्या शासन निर्णयातील पुर्वलक्षी प्रभावाने होणाऱ्या नियुक्त्याही रद्द झाल्या होत्या. या सगळ्या घडामोंडीवर मुख्यमंत्री शिंदे सातत्याने पाठपुरावा करीत होते. त्याचा परिपाक म्हणजेच उच्च न्यायालयाने या उमेदवारांच्या भरतीचा मार्ग मोकळा होईल, असा निर्णय दिला.

यामुळे तीन-चार वर्षांपासून रखडलेली भरती प्रक्रिया, तसेच नियुक्ती आता मार्गी लागणार आहेत. यात अडकलेले साधारण ३००-४०० वर्ग-१ व २चे मराठा उमेदवार तसेच १००-२०० इतर प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्त्याहीदेखील होणार आहेत, तसेच यापूर्वी झालेल्या सुमारे तीन हजार नियुक्त्यांवरील टांगती तलवारही दूर झाल्याने या सर्व उमेदवारांमध्ये तसेच आमच्या कुटुंबामध्ये आनंदाचे वातावरण परतल्याची भावनाही उमेदवारांनी व्यक्त केली. या सर्वांनी मुख्यमंत्र्यांना आपल्या सह्यांचे पत्र तसेच पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. या वेळी राजेंद्र कोंढरे, संजीव भोर-पाटील, अंकुश कदम, रघुनाथ चित्रे-पाटील आदी उपस्थित होते.

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न -मंत्री गिरीश महाजन

## महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे उद्घाटन, ५१३ स्टॉल

**मुंबई : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळावी, प्रत्येक महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावी. म्हणून शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही महालक्ष्मी सरसच्या माध्यमातून २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पादनांची विक्री होईल, असा विश्वास व्यक्त करीत ८ जानेवारी २०२४पर्यंत सुरू असलेल्या प्रदर्शनाला सर्वांनी भेट द्यावी, असे आवाहन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

एमएमआरडीए मैदान, वांद्रे (पूर्व) येथे महालक्ष्मी सरस २०२३-२४ या बचतगटांच्या उत्पादनांच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर ग्रामविकास मंत्री महाजन बोलत होते. या वेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रूचेश जयवंशी, नाबार्डचे व्यवस्थापकीय संचालक रेमंड डिसोजा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत, ग्रामविकास विभागाचे उपसचिव के. पी. पाटील,



उपायुक्त विकास कोकण विभाग गिरीश भालेराव, ग्रामविकास विभागातील अधिकारी, महिला बचत गटाच्या सदस्य या वेळी उपस्थित होत्या.

मंत्री महाजन म्हणाले की, महालक्ष्मी सरसमध्ये स्टॉल मिळावा यासाठी महिला आग्रही आहेत. या प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यासाठी आता महिला बचत गटांमध्येदेखील स्पर्धा निर्माण झाली आहे. प्रत्येक विभागनिहाय महालक्ष्मी सरस प्रदर्शन आयोजित करण्याबाबत विचार करणार असून याबाबत लवकरच अंमलबजावणी केली जाईल, असेही मंत्री महाजन म्हणाले.

# कर्नाळा किल्ल्यावर पर्यटकांचा ओघ

## वर्षभरात ६० हजार जणांची अभयारण्याला भेट


**पनवेल : वार्ताहर**

कर्नाळा अभयारण्यात विविध पक्ष्यांच्या प्रजातींचा अधिवास आहे. त्यामुळे पक्षीप्रेमींचा नेहमी या परिसरात वावर आहे, तसेच मुंबई-गोवा महामार्गावरील उंचावर असलेले थंड हवेचे ठिकाण असल्यामुळे गेल्या वर्षभरात ६० हजार जणांनी अभयारण्याला भेट दिली आहे. त्यामध्ये कर्नाळा किल्ल्यावर पर्यटकांचा ओघ वाढल्याचे चित्र आहे.

लोणावळ्याप्रमाणे कर्नाळा उंचावर असल्याने येथील हवाही नेहमी थंड असते. निसर्ग, हवेतील गारवा आणि शांतता यांचा संगम असलेल्या या अभयारण्यात दोन प्रकारची बने आहेत. याशिवाय, रानखाटीक, ठिपकेवाला सातभाई, कस्तुर, शिंपी, गिधाड, मुनिया, नाचन, सुगरण, बया, सुरेल, खाचू कवटा, राखी धोबी, भारतव्दाज, शामा, मोर, फुलटोचा, पावशा, बहिरा, कापशी घार, नीळकंठ पोपट, सूर्यपक्षी, हरियल यांसारखे सुमारे १३४ प्रजातींचे स्थानिक; तर ३८ प्रजातींचे स्थलांतरित पक्षी आहेत.

मुंबई, ठाणे आणि इतर ठिकाणाहून अनेक जण सुटी किंवा वेळ मिळेल, तेव्हा कर्नाळ्यात येत असतात. विशेष म्हणजे, कर्नाळा किल्ला हा पक्षीप्रेमींबरोबर गिर्यारोहकांचे आकर्षण आहे.





# पनवेल तालुका पोलिसांतर्फे आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील केळवणे गाव ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी मच्छिमार बांधव व कुटुंबियांसाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वतीने व ओम हेल्थ कअर सेंटर कामोठे यांचे मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबिर व बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित तपासणी शिबिरामध्ये बीपी, शुगर, प्रोटिन्स टेस्ट, इत्यादी आजारांबाबत तपासणी करण्यात आली आहे. शिबिरात एकूण २२ मच्छीमार बांधव, कुटुंबीयांनी



सहभाग घेतला होता.

या वेळी आयोजित बैठकीमध्ये सागरी सुरक्षेच्या दृष्टीने संशयित बोटी, ड्रोन, अनोळखी व्यक्ती, वाहन, तसेच बेवारस वस्तू आदींबाबत माहिती मिळताच स्थानिक पोलीस स्टेशन (०२२-२७४५२४४४) व कोस्टल हेल्पलाईन क्रमांक (१०९३) यावर संपर्क साधावा, याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

आरोग्य तपासणी शिबिर व सागर रक्षक बैठक पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांनी घेतली होती. या बैठक व वैद्यकीय तपासणी शिबिराला उत्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# पेण तालुक्यात आढळले कोरोनाचे चार रुग्ण

**पेण : प्रतिनिधी**

सध्या कोरोनाच्या नव्या व्हॅरियंटने डोके वर केले असून आरोग्य यंत्रणाही सज्ज झाली आहे. पनवेल तालुक्यात कोरोनाचे रुग्ण आढळल्यानंतर नव्याने संक्रमित होणाऱ्या जेएन१च्या चाचण्या सुरू केल्या आहेत. पेण तालुक्यात गेल्या पाच दिवसात चार पॉझिटीव्ह रुग्ण आढळून आले आहेत.

पेणमध्ये सोमवारी (दि.२५) १९ जणांच्या चाचण्या करण्यात आल्या. उपजिल्हा रुग्णालयात या चाचण्या सुरू आहेत. या तपासणीमध्ये गेल्या पाच दिवसांत चार पॉझिटीव्ह रुग्ण आढळून आले आहेत. यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र जितेमधील बळवली येथील एक रुग्ण आहे, तर तीन रुग्ण हे पेण कुंभारआळी, समर्थ वाडी येथील एकाच कुटुंबातील आहेत. यामध्ये आई, वडील आणि मुलीचा समावेश आहे. तालुक्यातील एकूण चार रुग्णांमध्ये दोन पुरूष व दोन महिलांचा समावेश आहे.

उपजिल्हा रुग्णालय पेण येथे खबरदारी म्हणून २० बेड तयार केले आहेत, तसेच हे चारही रुग्ण आपल्या घरीच उपचार घेत आहेत. त्यांची प्रकृती उत्तम आहे. पुढील सात दिवस क्वारंटाईन राहण्याच्या सूचना वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत देण्यात आल्या आहेत. सर्वांनी काळजी घेण्याचे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडकर यांनी केले आहे.

# फुंडे हायस्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय येथे शुक्रवारी (दि. २२) वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. वार्षिक स्नेहसंमेलन अंतर्गत फूड स्टॉल, वार्षिक पारितोषिक वितरण आणि सांस्कृतिक कार्यक्रमही झाले.

सुरुवातीला इ. पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी फूड स्टॉल्स उभारण्यात आले होते. यानंतर पारितोषिक वितरण सोहळा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्रमुख पाहुणे 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजीव धुमाळ, विद्यालयाचे प्राचार्य एम.जी. म्हात्रे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के.कुटे, स्कूल कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, रमाकांत म्हात्रे, सुरेश म्हात्रे, उमेश म्हात्रे, दर्शन ठाकूर, केशव कडू, महिला पोलीस हवालदार कनिष्का नाईक, शिक्षक पालक संघ सहसचिव प्रणाली कोळी व माता पालक संघाच्या सहसचिव प्रीती ठाकूर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. दुपारी सांस्कृतिक कार्यक्रम झाले. शाळेचे माजी विद्यार्थी आणि पागोटे गावचे विद्यमान सरपंच कुणाल पाटील यांनी कार्यक्रमासाठी उपस्थिती लावली.





**डोंबिवली : दरवर्षीप्रमाणे जुनी डोंबिवली गाव परिसरातील ग्रामस्थ मंडळाच्या वतीने श्री दत्त जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यानिमित्त सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी गुरूमाऊलींचे दर्शन घेतले. होम हवन, सत्यनारायण महापूजा, भजन, कीर्तन, महाप्रसाद आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

# आंगणेवाडीची जत्रा होणार २ मार्चला

**मालवण** : कोकणातील आंगणेवाडी येथील भराडी देवीच्या जत्रेची तारीख घोषित करण्यात आली आहे. २ मार्चला ही यात्रा होणार आहे. लोकसभा आणि पुढे होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# अलिबाग समुद्रकिनारी महोत्सवात खाद्यपदार्थांची विक्री व प्रदर्शन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महिलांनी तयार केलेल्या वस्तू, खाद्यपदार्थांची विक्री व प्रदर्शन अलिबाग समुद्रकिनारी ठेवण्यात आले होते. या उपक्रमाला स्थानिकांसह पर्यटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तीन दिवसांत दहा हजारहून अधिक नागरिकांनी भेटी देऊन खाद्यपदार्थांसह वस्तू, खरेदीची लूट केली. भारतीय उद्योजकता विकास संस्था, अहमदाबाद आयोजित, टाटा कम्युनिकेशन्स लि. मुंबई पुरस्कृत उद्यम प्रकल्प अंतर्गत प्रशिक्षित महिला उद्योजकांसाठी २३ ते २५ या कालावधीत वस्तू विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.



अलिबाग समुद्रकिनारी फिरण्यास येणाऱ्या पर्यटकांना एकाच ठिकाणी खाद्य पदार्थांसह वेगवेगळ्या वस्तूंची खरेदी करता यावी यासाठी विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री महोत्सव भरविण्यात आले होते. अलिबागपासून पनवेल, उरण, रोहा, पेण, माणगाव अशा अनेक तालुक्यांतील दुकाने या महोत्सवात उभारण्यात आले होते.

समुद्रकिनारी महोत्सवात असलेल्या नाचणी लाडू, वेगवेगळया प्रकारचे छायाचित्र, कपडे, फरसाण, ज्वेलरी आदी घरगुती व भेटवस्तू वेगवेगळ्या वस्तू, खाद्यपदार्थांची खरेदीदेखील मोठ्या प्रमाणात झाली. तीन दिवसीय महोत्सवातून अनेक व्यावसायिकांनी चांगला फायदा झाल्याचे सांगण्यात आले.

# थंडीमुळे गुळाच्या चहाला मागणी वाढली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढल्याने शरीरात उबदारपणा येण्यासाठी चहाच्या दुकानात लोकांची गर्दी होत आहे. उष्ण गुणधर्म असलेल्या गुळाचे पेय प्रकृतीला फायदेशीर मानले जात असल्याने पनवेल परिसरातील चहाप्रेमींचा गुळाच्या चहाकडे कल वाढत आहे.

चहा व्यवसायाची मागणी लक्षात घेऊन अनेक सुशिक्षित तरुण या व्यवसायाकडे वळले आहेत. शहरात, खेडेगावात अगदी महामार्गावर गुळाच्या चहाची दुकाने थाटली जात आहेत. माथाडी कामगारांची सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या कळंबोली शहरात गुळाच्या चहाला सर्वाधिक मागणी आहे.



हवेत गारवा असो की, उष्णता चहाची तल्लफ होतेच. त्यात जर थंडी पडली असेल तर चहाचे कपावर कप रिचवला जातो. उरण, पनवेल परिसरात सध्या थंडी जास्त प्रमाणात जाणवू लागल्याने चहाप्रेमींची पावले चहाच्या टपरीवर वळू लागली आहेत. पनवेल परिसरात मसाला चहा, नागोरी चहा, तंदुरी चहा, ग्रीन टी यांना मोठी मागणी आहे, मात्र साखरेच्या सेवनामुळे आरोग्यावर परिणाम होण्याच्या भीतीने चहाप्रेमी आता गुळाच्या चहाकडे वळू लागले आहेत. त्यामुळे जुने ते सोने या मत प्रवाहातून पनवेल परिसरात गुळाच्या चहाकडे लोकांचा कल वाढत आहे.

गुळाचा गोडवा जास्त वेळ टिकत असल्याने अनेक व्यावसायिकांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी गुळाच्या चहाचे फायदे सांगणारे फलक लावले आहेत. पनवेलमध्ये गुळाच्या चहाची दुकाने मोठ्या प्रमाणावर वाढली असून ग्राहकांची गर्दी देखील होत आहे.

> **घाटमाथ्यावरील लोक गुळाच्या चहाला जास्त पसंती देत आहेत. गुळाचा चहा तयार करण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी आहे. चांगल्या प्रतीच्या गुळामुळे चहाची चव वाढते. कळंबोली विभागात माथाडी कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात असून गुळाचा चहा ते आवडीने पीत आहेत.**
> **-महेश गोडसे, चहा विक्रेता**

# आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना संरक्षण

## प्रत्येक जिल्ह्यात विशेष कक्ष; गृहविभागाचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह करू इच्छिणाऱ्या जोडप्यांना संरक्षण देण्यासाठी तसेच ऑनर किलिंगसारख्या गुन्ह्यांना रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर अशा जोडप्यांना पोलिसांचा बंदोबस्त असलेले सुरक्षागृहही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गृहविभागाने हा निर्णय घेतला आहे.

देशात विशेषतः हरियाणा व उत्तर प्रदेशात २००९मध्ये मोठ्या प्रमाणावर ऑनरकिलिंगच्या घटना सोमर येत होत्या. त्यामुळे तरुण मुलामुलींमध्ये एक भीतीचे, दहशतीचे वातावरण पसरले होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात यापुढे आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा पुरविण्याच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. त्यात जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचा सदस्य म्हणून, तर जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश असेल. आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहाबद्दल प्राप्त होणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन हा कक्ष तत्काळ कारवाई करेल, असे गृह विभागाच्या आदेशात म्हटले आहे.

पोलिसांच्या विशेष कक्षामार्फत केल्या जाणाऱ्या कारवाईचा तसेच न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीचा त्रमासिक आढावा घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यतेखाली समिती असणार आहे. आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना आवश्यकतेप्रमाणे सुरक्षागृह उपलब्ध करून देण्याची दक्षता ही समिती घेईल.

## दुखवटा

### हभप सरस्वती शिंगरे



**रोहा** : तालुक्यातील गोफण येथील वारकरी संप्रदायात सेवा करणाऱ्या सरस्वती भास्कर शिंगरे यांचे वयाच्या ८५व्या वर्षी वृद्धत्वाने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, नातंवड असा परिवार आहे. पुढील दशक्रिया विधी १ जानेवारी २०२४ रोजी गोफण बंदर येथे राहत्या घरी होणार आहे. दशक्रियानिमित्त हभप नित्यानंद महाराज मांडवकर यांचे संध्याकाळी प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. हभप सरस्वती शिंगरे यांचे तेरावे ४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. या वेळी हभप बबन महाराज कडू (कुडली आंबिवली) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

# कोरोना : घाबरू नका, पण जागरूक रहा!

## पनवेल महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

देशातील काही भागात कोविडचा जेएन१ या नवीन विषाणूचे रुग्ण आढळून आल्याने चिंता वाढली असली तरी घाबरून न जाता जागरूक राहण्याचे आवाहन महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.



नागरिकांनी कोविडसदृश्य लक्षणे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करून नये. कोरडा खोकला, ताप, घसा खवखवणे, श्वास घेण्यास त्रास जाणवत असेल तर चाचणी, सर्वेक्षण आणि उपचार या त्रिसूत्री पालन करावे अशा सूचना प्रशासनाच्यावतीने मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गासेवी यांनी दिल्या आल्या आहेत. कोरोनाशी लढायचे असेल तर सतर्कता बाळगणे हाच महत्वाचा उपाय आहे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळणे, मास्कचा वापर करणे, वारंवार हात साबणाने धुणे, सुरक्षित अंतर राखणे अशा काही महत्त्वाच्या गोष्टीचे पालन केल्यास कोविडचे संकट टाळता येणे शक्य आहे.

कोविडच्या जेएन १ या नवीन विषाणूच्या पार्श्वभूमीवरती नुकताच आयुक्तांनी वैद्यकिय सोयी सुविधांचा आढावा घेतला. महापालिका हद्दीतील डीसीएच कळंबोली व खाजगी रूग्णालयामध्ये आयसोलेशनचे ऑक्सीजन विरहित २४४ खाटा, आयसोलेशन ऑक्सीजनसहित ७८९ खाटा, २५८ आयसीयू खाटा, ९४ व्हेंटिलेटर उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

### प्रतिबंधात्मक उपायांचे पालन करा

कोविडची लक्षणे असलेल्या रुग्णांनी महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामधील मोफत चाचणी व उपचाराचा लाभ घ्यावा तसेच नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहून महापालिकेने सांगितलेल्या प्रतिबंधात्मक उपायांचे पालन करण्याविषयीचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.



**खारघर : तळोजा सिटी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने २०२४ सालची नवीन वर्षाची दिनदर्शिका अध्यक्ष ॲड. चेतन नागेश भोईर यांनी प्रसिद्ध केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. या वेळी भाजपचे युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, प्रशांत भंडारी, धनंजय नेरूळकर, देव भोईर, पवन भोईर, प्रतिक भोईर, सचिन बेडेकर आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

## पनवेल परिसरात भिकारी, तृतीयपंथीयांचा वावर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील अनेक सिग्नलवर भिकारी आणि तृतीयपंथीयांचा उपद्रव वाढला आहे. विशेषतः शहरातील बहुतांशी प्रमुख सिग्नलवर तृतीयपंथीयांनी कब्जा केला आहे. सिग्नलवर गाडी थांबताच हे तृतीयपंथीय त्या गाडीला गराडा घालत आहेत. त्यामुळे वाहनधारकांची तारांबळ उडत आहे. या पार्श्वभूमीवर या तृतीयपंथीयांवर कारवाईची मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे.



वाहतूक नियंत्रणाच्या दृष्टीने शहरात आवश्यक तेथील चौकात आणि रस्त्यांवर वाहतूक विभागाने सिग्नल यंत्रणा कार्यान्वित केली आहे. यातील प्रमुख सिग्नल आणि चौकात भिकारी आणि तृतीयपंथीयांनी आपले बस्तान ठोकले असून भीक मागणाऱ्या तृतीयपंथीयांची संख्या वाढल्याचे दिसून येते. अनेक वेळा गाडीच्या काचेवर थाप मारत पैसे मागतात. भीक मागणारे लहान मुले आणि वृद्ध महिला चक्क गाडीच्या समोर येऊन विनवणी करताना दिसतात. बहुतांशी सिग्नलवर तृतीयपंथीयांचा उपद्रव वाढल्याचे दिसून आले आहे. सायन-पनवेल महामार्गावरील सिग्नल तर तृतीयपंथीय आणि भिकाऱ्यांना आंदण दिल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर तृतीयपंथीय आणि भिकाऱ्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली जात आहे.

यांच्या जोडीला विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री करण्याच्या बहाण्याने भीक मागणारी लहान मुले, महिला आणि विकलांगांसह वृद्धही दिसून येत आहेत. सिग्नलवर गाडी थांबताच हे तृतीयपंथीय गाडीच्या काचेवर हाताने थाप मारून भीक मागतात. तर काही जण रात्रीच्या वेळीसुद्धा अश्लील हावभाव करीत महामार्गावर उभे असतात.

# शिवाजीनगरमध्ये ग्रंथ पारायण सोहळा उत्साहात







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सालाबादप्रमाणे यंदाही पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील श्री स.स. बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात श्री. रामशेठ ठाकूर ग्रामस्थ मंडळ संयोजित, देवसागर साधक समाज यांच्यातर्फे गुरुचरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचा पारायण सोहळा २४ ते २६ डिसेंबरदरम्यान आयोजित करण्यात आला होता.

स. स. बाळासाहेब महाराज, हभप आप्पा पांचाळ महाराज यांच्या हस्ते रविवारी सप्ताहाला प्रारंभ करण्यात आला. पहिल्या दिवशी संत जनाबाई भजन मंडळ विहीघर, श्री गुरुकृपा भजन मंडळ, भावभक्ती महिला भजन मंडळ खारकोपर यांनी भजनसेवा केली. या वेळी ग्रामस्थ मंडळ व माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत यांच्यातर्फे सर्व भजनी मंडळांचे स्वागत करण्यात आले.

या सोहळ्यादरम्यान दररोज काकड आरती, श्रींची नित्य पूजा, संगीत भजन, प्रवचन, दुपारची आरती, संगीत भजन, संध्याकाळची आरती, ग्रंथ वाचन व ध्यान, भजन व कीर्तन यांसारखे धार्मिक कार्यक्रम झाले.

याचबरोबर मंगळवारी नादब्रम्ह साधना भजन मंडळ देवसागरसाधक समाज सामुदायिक संगीत यांचे भजन झाले आणि श्री.स.स.बाळासाहेब महाराज यांचे प्रवचन झाल्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते श्री बाळकृष्ण माउलींवर पुष्पवृष्टी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, वसंतशेठ पाटील, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, शकुंतला रामशेठ ठाकूर, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, अमोघ ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ आणि ठाकूर कुटूंबीय उपस्थित होते.

## रेल्वेची ठोकर लागून एकाचा मृत्यू

**पनवेल :** रेल्वेची ठोकर लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

अनोळखी बेवारस व्यक्ती वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, केस काळे वाढलेले, अंगात गुलाबी शर्ट व निळी फुल पॅन्ट, चॉकलेटी छोटी पॅन्ट तसेच कमरेला काळा करदोडा, उजव्या हातामध्ये केशरी दोरा आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक हर्षद जुईकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## तब्बल ५११ किलो मांगुर मासे जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील देवद येथे मोकळ्या जागेत मांगुर माशाची विक्री करणाऱ्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खांदेश्वर पोलिसांनी टाकला छापा

देवद हद्दीतील पुष्प नारायण सोसायटी बिल्डिंगजवळील जागेत बंदी असलेल्या मांगुर माशाची विक्री होत असल्याची माहिती खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सी.बी. लांडगे यांना मिळाली त्यानुसार वपोनि लांडगे आणि त्यांच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकला. या वेळी ५११ किलो बंदी असलेले मांगुर मासे जप्त करण्यात आले. या वेळी पोलिसांनी अशा प्रकारे कुठे बंदी असलेले मांगुर माशाची विक्री किंवा साठवणूक व मांगुर माशाचे पालन केले जात असेल तर याची माहिती ११२ नंबर वर देण्याचे तसेच मांगुर माशामुळे कॅन्सर होण्याची संभावना असते त्यामुळे हा मासा कोणीही खाऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले.



















**पनवेल : श्री दत्त जयंतीनिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यातील बामनडोंगरी, गव्हाण, शिवाजीनगर, आरिवली, शिवकर, मोहो, पाली खुर्द, दुंदरे, मोरबे, वावंजे या ठिकाणीच्या दत्त मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेतले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, अंकुश ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, आयोजक, भाविक उपस्थित होते.**

## पनवेल मनपामध्ये वीर बाल दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या मुख्यालयात मंगळवारी वीर बाल दिवस निमित्ताने गुरू गोविंदसिंगांच्या पुत्रांसहित असलेल्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

दहावे शीखगुरू गोविंदसिंग यांचे पुत्र जोरांवरसिंह व फतेसिंह यांचे वय ९ व ६ वर्ष असताना शीख संप्रदायाचा सन्मान, अस्मिता हेतू आणि रक्षणार्थ त्यांनी हौतात्म्य पत्करले. याचीच आठवण म्हणून त्यांना अभिवादन करण्यासाठी त्यांचा हौतात्म्यदिन वीर बाल दिवस म्हणून साजरा केला जात आहे. कार्यक्रमास महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## लिमये वाचनालयात अमृत महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल या संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ बुधवार (दि. २७) व गुरुवार (दि. २८) होणार आहे.




अमृत महोत्सवी पुर्वसंध्येला विनामूल्य कार्यक्रम अप्पा ठाकूर यांचे गझल सादरीकरण कार्यक्रम गुंतलेले पाश निवेदिका डॉ. मृण्मयी भजक सायंकाळी ५.१५ वाजता ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल येथे आयोजित केले आहे. गुरुवारी सकाळी ८:३० ते ९:३० यावेळेत ग्रंथदिंडी आयोजित केली आहे. के. गो. लिमये वाचनालय ते ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल कार्यक्रमाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस तसेच प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार अमर वार्डे व प्रमुख उपस्थिती कोकणभवन सहाय्यक ग्रंथालय संचालक मंजुषा साळवे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, उद्योजक जे. एम. म्हात्रे, बाळाराम पाटील, पनवेल मनपा आयुक्त गणेश देशमुख उपस्थित राहणार आहेत.

परिसंवाद दुपारी १२ ते १.३० वाजेपर्यंत ग्रंथालये आणि वाचन संस्कृतीचे भवितव्य या विषयावर होणार आहे. अध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे, चांगदेव काळे, प्रमोद कर्नाड, योगेशचंद लोहोकरे, रोहिदास पोटे यांचे परिसंवाद आयोजित केले आहे.

समारोप सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ सदस्य एल.बी.पाटील यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल येथे सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा सुनिता जोशी व कार्यकारी मंडळातील सभासदांनी केले आहे.

पाहिजेत

संपर्क सल्लागार / अधिकारी

आम्ही मुंबई मधील प्रसिद्ध विकासक आहोत आणि मुंबई व नवी मुंबई मध्ये मोठे प्रकल्प निर्माण करत आहोत

आम्हाला अशा उमेदवाराची गरज आहे जे सिडको/ नैना/ महसुल विभाग या आस्थापना मधुन निवृत्त झाले आहे आणि जे आम्हाला नैना/ महसुल विभाग कडून जरूर असलेली महत्त्वाची माहिती व मंजुरी मिळवण्यात सहकार्य करतील.

तरी पात्र उमेदवारांनी आपला cv: **hr@mapletreeproperty.com** या email वर पाठवा

मॅपलेट्री प्रॉपर्टी प्रा. लि.

तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४० ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेल समोर, केम्प्स कॉर्नर, ग्रँट रोड (पश्चिम), मुंबई-४०००२६. फोन: २३८३५५५५/ ७५०६५०६०९३

## संपादकीय

# पुन्हा ईव्हीएमचा गजर

भाजपचे सरकार केंद्रात सत्तेवर येण्यापूर्वी ईव्हीएमला फारसा कुणी विरोध केला नव्हता. कारण त्यापूर्वी मधली काही वर्षे वगळली तर काँग्रेसचीच राजवट होती. येत्या काही महिन्यांत लोकसभेच्या निवडणुका जाहीर होतील. याही वेळेस काँग्रेससह इंडिया आघाडीचे पानिपत होणार हे सारेच ओळखून आहेत. म्हणूनच ईव्हीएमबाबत पुन्हा एकदा काँग्रेसजनांनी कोल्हेकुई सुरू केली आहे.

**निवडणुकांचे वेध लागले की सर्वच राजकीय पक्ष आणि इच्छुक उमेदवार तयारीला लागतात. संसदीय लोकशाहीमध्ये हे काही नवीन म्हणता येणार नाही. भारतासारख्या देशामध्ये तीन गोष्टींची नवलाई कधीच कमी झाली नाही आणि होणारही नाही. क्रिकेट, चित्रपट आणि निवडणुका या त्या तीन गोष्टी. यापैकी चित्रपट आणि क्रिकेट या विरंगुळ्याच्या गोष्टी म्हणून आपण घटकाभर दूर ठेवू. निवडणुकींमुळे मात्र देशाला दिशा मिळत असते. नव्वदीच्या दशकामध्ये निवडणूक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्याच सुमारास ईव्हीएम म्हणजेच मतदानयंत्राचा उदय झाला. या मतदान यंत्राने संपूर्ण निवडणूक यंत्रणेचे जणु पुनरूज्जीवन झाले. मतदानयंत्राच्या वापरापूर्वी ज्या काही निवडणुका पार पडल्या, त्यामध्ये हिंसाचार, मतदान केंद्रावरील दरोडे, मतपेट्यांची पळवापळवी असले प्रकार सर्रास व्हायचे. उत्तरेत तर उमेदवार पळवून नेण्यापर्यंत समाजकंटकांची मजल जात असे. याखेरीज लाखोंच्या संख्येने भरणाऱ्या मतपेट्या सांभाळण्याचे आणि त्यातील मतपत्रिकांची एकेक करून मोजणी करण्याचे अवाढव्य जिकिरीचे काम निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना अहोरात्र करावे लागत असे. छपाईचा खर्च, मतपेट्यांच्या निर्मितीचा खर्च आणि त्यापाठोपाठ वाढणाऱ्या अवाढव्य निवडणूक यंत्रणेचा खर्च यामुळे निवडणुका महागड्या ठरू लागल्या होत्या. ईव्हीएमने मात्र अक्षरश: क्रांती घडवून आणली. या यंत्रामध्ये काही बिघाड हेतुपुरस्सर करण्याचा संभवच नसतो. अत्यंत सुरक्षित आणि किफायतशीर असे हे मतदानयंत्र भारतीय लोकशाहीला मिळालेले एक वरदानच आहे असे म्हणावे लागेल. तथापि, भारतातील विरोधीपक्षांना मात्र ईव्हीएमचे हे फायदे मान्य नाहीत. ईव्हीएममध्ये गडबड करता येते असा संशय तेवढा त्यांच्या मनात आहे. अर्थात या संशयापलीकडे त्यांच्या हातात काहीही नाही. ईव्हीएम यंत्राच्या विरोधात जाणारा एकही पुरावा विरोधीपक्षाच्या कुठल्याही कार्यकर्त्याला किंवा नेत्याला दाखवता आलेला नाही. विरोधीपक्षांचा ईव्हीएमला विरोध केवळ एकाच व्यक्तीमुळे आहे. ती व्यक्ती म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी! २०१४ साली मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर विरोधीपक्षांना कापरे भरले ते भरलेच. सलग नऊ-दहा वर्षे पंतप्रधान मोदी प्रत्येक निवडणूक जिंकतात हे कसे, असा त्यांच्या मनातला खरा सवाल आहे. ईव्हीएमसोबत असणाऱ्या व्हीव्हीपॅट यंत्राचा उपयोग मतपत्रिकांप्रमाणे करावा अशा प्रकारचा ठराव विरोधकांच्या आघाडीने मंजूर केला असून तो घेऊन पुन्हा निवडणूक आयोगाकडे दाद मागण्याचे त्यांनी ठरवले आहे. महाराष्ट्रात ठाकरे गट वगळता बाकी कुठलाही पक्ष ईव्हीएमला विरोध करताना दिसत नाही. काँग्रेस काय किंवा ठाकरे गट काय हे जनतेच्या मनातून उतरलेले पराभूत पक्ष आहेत. त्यांना ईव्हीएमचा मुद्दा उगाळत बसण्यापलीकडे काही कामच उरलेले नाही. दरम्यान, निवडणूक आयोगाने मात्र देशव्यापी ईव्हीएम जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. ईव्हीएम हे यंत्र गुप्त मतदानासाठी आदर्श असून ते सुरक्षित आणि सोयीस्कर आहे हे जनतेला पटवून देण्यासाठी ही मोहीम आखण्यात आली आहे. भारतासारख्या अफाट लोकसंख्येच्या लोकशाही देशात तूर्तास तरी ईव्हीएमला पर्याय नाही हे सत्य आहे.**

# तरुण पिढी चांगल्या नोकरीच्या शोधात

आज मुलांना शाळेत प्रवेश घेतानाच पालकांची धावपळ सुरू होते. त्यानंतर महाविद्यालयात प्रवेश त्यासाठी ओळख, डोनेशन, या सगळ्या दिव्यातून बाहेर पडून डिग्री हातात मिळाली की नोकरीसाठी धडपड. दरवर्षी विद्यापीठ नामक कारखान्यातून लाखो पदवीधर आणि तंत्रज्ञ बाहेर पडतात, पण आजच्या कॉम्प्युटर युगात मनुष्यबळ कमी लागत असल्याने बेकारांची संख्या वाढत आहे. त्यामुळे पालकांची आपल्या पाल्याला नोकरी लावण्यासाठी वेळप्रसंगी मध्यस्थाला लाखो रुपये देण्याची तयारी असते.



नवी मुंबईत नोकरी मिळवून देण्यासाठी लाखो रुपये घेऊन फसवणूक केल्याच्या बातम्या हल्ली रोजच आपल्याला वाचायला मिळतात. चांगल्या कंपनीत नोकरी लावतोपासून ते सरकारी खात्यात नोकरी लावण्यापर्यंत अशा गुन्हेगार व्यक्ती मदत करीत असतात. त्यामध्ये अनेक अधिकारीही सहभागी असतात. पैसे देऊन काही वेळा नोकरी मिळते ही पण अनेक वेळा पैसे देऊन फसवणूक होते. पैसे देऊन नोकरी मिळत नाही. नोकरी मिळेल या आशेने पालकांनी कर्ज काढून आणलेले पैसे बुडल्याने त्यांना कर्ज बाजारी व्हावे लागते. त्यावेळी पूर्वीचे बरे होते असे आपण सहज म्हणतो.

आज नोकरीसाठी फसवणूकीच्या गुन्ह्यात झालेली वाढ निश्चितच चिंताजनक आहे. पण याला जबाबदार कोण? मला आठवते काही वर्षांपूर्वी एक जण ओळखीच्या एका कंपनीत नोकरीला लावा सांगायला आला होता. त्याला विचारले तुझे शिक्षण किती दुसऱ्या प्रयत्नात १० वी पास आणि टायपिंग केले आहे. पगारची अपेक्षा ही मोठी होती. त्याला सांगितले या पेक्षा कमी पगारात पदवीधर मुली कंपनीत काम करीत आहेत. तुला एवढा पगार वर्करमध्ये काम केलेस तर मिळू शकतो. त्याचे म्हणणे मग माझे टायपिंग फुकट जाईल. दूसऱ्या एकाची अपेक्षा संध्याकाळी ५ वाजता घरी पाहिजे कारण संध्याकाळी फिरायला मिळाले पाहिजे. एका मुलाला चांगली नोकरी मिळाली, पगार चांगला होता सगळे त्याच्या मनासारखे होते पण नोकरीचे ठिकाण घरापासून लांब होते. मग घरची आठवण येते म्हणून त्याने त्या भागात चोऱ्या होतात असे कारण सांगून नोकरी सोडून दिली. आजच्या मुलांच्या या अटी ऐकून खरेच नवल वाटते. अशा वेळी पालक ही मुलांना पाठीशी घालतात. त्यांच्या नोकरीसाठी पैसा खर्च करायला तयार होतात त्यामुळेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचे फावले आहे. त्याचा परिणाम अशा गुन्ह्यांची वाढ झालेली आपल्याला पाहायला मिळत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या अग्निपथ योजनेंतर्गत तरुणांना चार वर्षांसाठी सैन्यात भरती केले जाईल. कोरोना महामारीमुळे गेल्या दोन वर्षांपासून सैन्यात भरती थांबली आहे. त्यामुळे एका बाजूला सैनिकांच्या कमतरतेची समस्या कमी होईल. त्याचबरोबर सैनिकांवर होणारा खर्चही कमी होण्याची शक्यता आहे. पूर्वी जिथे नवीन सैनिकांना नऊ महिन्यांचे प्रशिक्षण घ्यावे लागत होते आणि वेतनश्रेणीही कमी होती. आता तिथे फक्त सहा महिने प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणानंतर सैनिकांना 'अग्नवीर' म्हटले जाणार असून त्यांना पहिल्या वर्षी महिन्याला ३० हजार रुपये वेतन मिळणार आहे . त्यानंतर दुसऱ्या वर्षी त्यात वाढ होऊन ३३ हजार होईल. तिसऱ्या वर्षी हे मानधन प्रति महिना ३६५०० मिळेल. तर चौथ्या वर्षी यात वाढ होऊन महिना ४० हजार रुपये वेतन मिळेल. चार वर्षांचा कालावधी संपल्यानंतर सुमारे ७५ टक्के जवान निवृत्त होतील, मात्र निवृत्तीनंतर निवृत्ती वेतन मिळणार नसून, त्या बदल्यात त्यांना १० ते १२ लाख रुपयांची आकर्षक रक्कम दिली जाणार आहे. तर २५ टक्के जवानांना दीर्घ कालावधीसाठी मुदतवाढ दिली जाऊ शकते.

### ज्येष्ठांनी सांगितला अनुभव

**मी मूळचा नाशिक जिल्ह्यातील एअर इंडियात भरती निघाली म्हणून माझ्या मामांनी मला मुंबईला बोलावून घेतले. मी अर्ज केला मला मुलाखतीला बोलवण्यात आले. मामा मुंबईत राहत होते त्या भागातील काही तरुण मुलांनी मला तुला उद्या मुलाखतीला जायचे आहे ना आम्ही घेऊन जाऊ असे सांगून मला दादरला आणले एका प्रसिध्द हॉटेलात घेऊन गेले. वडा खाऊन सगळे निघून गेले. माझ्याजवळ पैसे नसल्याने हॉटेल मालकांनी मला भांडी घासायला सांगितले. मी दिवसभर भांडी घासली. संध्याकाळी मालकांनी माझी चौकशी केली. मी उद्या एयर इंडियात मुलाखतीला जायचे असल्याचे सांगितल्यावर त्यांनी मला मुलाखतीचे पत्र दाखवायला सांगितले. पत्र दाखवल्यावर त्यांनी त्यांच्या नातेवाईकाला फोन केला. त्यांना काही तरी सांगितले. दुसऱ्या दिवशी मी मुलाखतीला गेलो तर तीच व्यक्ती मुलाखत घेत होती मला त्यांनी कधीपासून हजर होतोस असे विचारले मी लगेच होतो बोललो आणि सेकंड शिपला मी कामावर हजर झालो. नवीन पनवेलमधील एक ज्येष्ठ नागरिक आपण नोकरीला कसे लागलो याचा अनुभव सांगत होते. त्यांचे अनुभव ऐकून नक्कीच असे वाटते की ७०च्या दशकात नोकरी मिळणे किती सोपे होते.**



तरुणांना नोकरीदरम्यान अभ्यासक्रम करता येणार आहे, त्यानंतर त्यांना सरकारी नोकरीत राखीव जागा असणार आहेत. अनेक कंपन्यांनीही नोकरीत राखीव जागा ठेवण्याचे मान्य केले आहे. असे असताना या योजनेला होणारा विरोध पाहिला की आजच्या तरुणांना झालेय तरी काय? असा प्रश्न पडतो. याच वेळी मुस्लिम समाज काही ठिकाणी आपल्या तरुणांना या योजनेत भरती होण्याचे आवाहन करीत आहे. यामध्ये त्यांचा दूरदर्शीपणा दिसत असताना तरुणांनी जाती पातीचे राजकारण करीत आपण बेरोजगार होऊन माथी भडकावणाऱ्यांच्या सतरंज्या उचलायच्या, गुन्हे दाखल करून घेऊन चांगल्या नोकऱ्या गमवायच्या की दूरदर्शीपणा दाखवायचा हे ठरवले पाहिजे.



## बदलते तंत्रज्ञान

# 'या' उपकरणाने होणार डासांपासून बचाव

यूएसबी या साधनांचा विविध प्रकारे उपयोग केला जातो. इतर डिव्हाइजना कनेक्ट करून चार्ज करणे, डेटा किंवा फाईल ट्रान्सफर करणे आदी बऱ्याच गोष्टींसाठी याचा उपयोग



करण्यात येतो. पण, तुम्ही कधी असे ऐकलेय का? की, एका यूएसबी-सी-डोंगलमधील उष्णतेने तुमचा डास, माशी या कीटकांपासून बचाव केला आहे. नाही; तर अलीकडेच एक नवीन यूएसबी-सी डोंगल बाजारात आणले गेले आहे; त्यातील उष्णतेद्वारे तुमचा डास चावण्यापासून बचाव होऊ शकतो.

कामेडी या जर्मन कंपनीने 'हीट-इट' यूएसबी टाईप-सी डोंगलचे अनावरण केले आहे आणि असा दावा केला आहे की, ते डोंगल डास, माशी यांपासून तुमचा बचाव करू शकते. हे छोटे गॅझेट तुमच्या फोनच्या Type-C पोर्टमध्ये सहज बसू शकते. त्यात धातूचा पृष्ठभाग आहे; जो उष्णता निर्माण करतो. हे गॅझेट वापरण्यासही खूप सोपे आहे. तुम्हाला ते तुमच्या फोनमध्ये कनेक्ट करावे लागेल आणि iOS किंवा Android ॲप वापरावे लागेल.

या ॲपद्वारे तुम्ही हीट ट्रीटमेंट कस्टमाइज करू शकता. जर तुम्हाला त्याबाबत तुमच्या मुलांबद्दल काळजी वाटत असेल, तर तुम्हाला या समस्येचे निराकरण ॲपमध्येदेखील मिळेल. हे ॲप मुलांसाठी अनुकूल किंवा संवेदनशील स्किन मोडसह येते; जे त्वचेनुसार तापमान सेट करते. उष्णतेमुळे डास किंवा इतर कीटक जर तुम्हाला चावले असतील, तर तो भाग लवकर बरा होण्यास मदत होते. कामेडी एका अभ्यासाच्या आधारे आपल्या उत्पादनाच्या या क्षमतेचा दावा करीत आहे.

हे जगातील पहिले कंट्रोल्ड कन्सट्रेटेड 'हीट इफेक्ट' संशोधन आहे; जे कीटक चावल्यानंतर उदभवणाऱ्या खाजेपासून आराम देते. या संशोधनात सुमारे १२ हजार लोकांवर उपचार करण्यात आले आहेत. संशोधनात असे आढळून आले आहे की, हे उपकरण वापरल्यानंतर लोकांना डास किंवा इतर कीटक चावल्यामुळे कमी खाज सुटते. आयफोन आणि ॲण्ड्रॉइड दोन्ही युजर्स हे उपकरण वापरू शकतात. येथे ॲण्ड्रॉइड आधीच टाइप-सी पोर्टसह आला आहे. टाईप-सी पोर्ट आता आयफोनमध्येही जोडण्यात आला आहे. तसेच हे हीट-इट डोंगल अमेरिकन आणि युरोपियन मार्केटमध्ये अमेझॉनवर उपलब्ध आहे.

# रसायन-जीवशास्त्रज्ञ लुई पाश्चर

## निमित्त



२७ डिसेंबर १८२२ रोजी जन्मलेले फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ आणि जीवशास्त्रज्ञ लुई पाश्चर यांनी निसर्गातील सूक्ष्मजीवसृष्टीकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन दिला. गरीब चर्मकार कुटुंबात जन्मलेल्या पाश्चर यांना लहानपणी शिक्षणापेक्षा मासेमारी व चित्रकला यात विशेष रस होता. इ.स.१८४७मध्ये डॉक्टरेट संपादन केल्यावर स्टॉसबर्ग विद्यापीठात त्यांची प्राध्यापकपदावर नियुक्ती झाली. त्यांचे सुरवातीचे संशोधन रसायनशास्त्रात होते.

टार्टारिक आम्लाच्या रेणूंचा अभ्यास करताना त्यांच्या लक्षात आले की नैसर्गिक आणि कृत्रिमरीत्या तयार केलेल्या टार्टारिक आम्लाचे भौतिक आणि रासायनिक गुणधर्म एकसारखे असले तरी त्याची ध्रुवीकृत प्रकाशाची दिशा बदलण्याची क्षमता वेगळी असते. या आम्लाच्या स्फटिकांचा सखोल अभ्यास करून पाश्चर यांनी आण्विक विषमतेचे अस्तित्व शोधले. यालाच आज स्टीरिओकेमिस्ट्रीचा पाया मानला जातो.

१८५४मध्ये लिले विद्यापीठात विज्ञान शाखेचे डीन म्हणून नियुक्त झाले असताना, त्यांना स्थानिक डिस्टिलरीमध्ये अल्कोहोल उत्पादनाशी संबंधित समस्या सोडवण्यास मदत करण्यास सांगितले गेले. त्यासाठी त्यांनी अल्कोहोलिक किण्वन प्रक्रियेवर अभ्यास सुरू केला आणि त्या प्रक्रियांमध्ये जीवांचा सहभाग असल्याचे प्रायोगिक पुरावे सादर केले. तसेच विविध किण्वन प्रक्रियेत त्यांचे विशिष्ट जीव संबंधित असल्याचे दर्शविले. यातूनच पुढे जैवतंत्रज्ञानाचा उगम झाला.

इ.स.१८६३मध्ये फ्रान्सचे सम्राट नेपोलियन-तिसरे यांच्या विनंतीनुसार, पाश्चर यांनी वाइन दूषित का होते, याचा अभ्यास केला. इतर अनावश्यक सूक्ष्मजीवांमुळे दूषित होण्यापासून रोखण्यासाठी, पाश्चर यांनी वाइन ६० अंश ते १०० अंश सेल्सिअस तापमानाला ३० मिनिटे गरम करण्याची प्रक्रिया वापरली. यालाच पाश्चरायझेशन असे संबोधतात. आज जगभरात अनेक पदार्थ, पेये व दुधाचे दीर्घकाळ जतन करण्यासाठी पाश्चरायझेशनचा वापर केला जातो.

इ.स.१८४९च्या सुमारास फ्रान्समध्ये रेशमाच्या किडय़ावर रोगाची लागण होऊन संपूर्ण युरोपातील रेशीमउद्योगाचे मोठय़ा प्रमाणावर नुकसान होऊ लागले होते. त्यावर पाश्चर यांनी अखेर इ.स.१८६७ मध्ये अळय़ांची दूषित झालेली अंडी नष्ट करून निरोगी अंडय़ांपासून अळय़ा तयार करण्यात यश मिळवले व रोगावर नियंत्रण झाले.

पाश्चर यांनी प्राण्यांच्या व माणसांच्या अनेक प्राणघातक रोगांना कारक असलेले जंतू व त्यांचा परस्परसंबंध प्रथमच सिद्ध केला. यातूनच विज्ञानाला कलाटणी देणारा जंतू-सिद्धांत उदयाला आला. त्यांनी लसनिर्मितीचे शास्त्र विकसित केले. सर्वप्रथम कोंबड्या व नंतर माणसांसाठी अँथ्रॅक्स, रेबीज, कॉलरा, घटसर्प, क्षय, देवी यावर रोगप्रतिबंधक लसी तयार केल्या.

इ.स.१८८७मध्ये त्यांनी 'पाश्चर इन्स्टिटयूट'ची स्थापना केली. अनेक रोगांवरील उपचार व प्रतिबंधाच्या क्षेत्रात आजही पॅरीसमधील ही संस्था अव्वल दर्जाची मानली जाते.

**-डॉ. अपर्णा दुभाषी**

## क्लिक...क्लिक...!



**रत्नागिरी : कोकणची भूमी म्हणजे निसर्गाची मुक्त हस्ते उधळण. विविध प्रकारची झाडे येथे पहावयास मिळतात. शहरापासून काही अंतरावर असणाऱ्या कसोप गावातील एक भरपूर सावली देणारे झाड प्रत्येक वाटसरूचे लक्ष वेधते.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# थंडीमध्ये आहारात 'असे' पदार्थ खाणे फायदेशीर

थंडीच्या दिवसांत हवेत गारठा असल्याने खाल्लेले अन्न चांगले पचते. तसेच तब्येत कमावण्यासाठी हा काळ अतिशय चांगला असतो त्यामुळे या काळात पौष्टीक पदार्थ खाऊन, व्यायाम करुन वर्षभरासाठी तब्येत कमावली जाते. थंडीत शरीराला ऊर्जेची आणि पौष्टीक घटकांची आवश्यकता असल्याने या काळात सुकामेवा, भाजीपाला, फळं अशा पौष्टीक आणि तीळ, गूळ, बाजरी असे उष्णता देणारे पदार्थ खाल्ले जातात. पण हिवाळ्यात आवर्जून खाल्ले जाणारे काही पदार्थ असतात ते कोणते आणि ते खाल्ल्याने शरीराला नेमके कोणते घटक मिळतात हे समजून घ्यायला हवे. पाहूयात या काळात आहारात कोणत्या गोष्टींचा आवर्जून समावेश करायला हवा, जेणेकरुन शरीराला ऊर्जा मिळण्यास मदत होईल.



**१. कार्बोहायड्रेटस :** कार्बोहायड्रेटस आपल्या आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त असतात. ओटस, ब्राऊन राईस, फळं यांच्यामध्ये कार्बोहायड्रेटसचे प्रमाण जास्त असते. वरील पदार्थांमध्ये कार्बोहायड्रेसटसोबतच फायबर, व्हिटॅमिन्स, खनिजे यांचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे शरीराचे चांगले पोषण होण्यास मदत होते.

**२. मसाले :** मसाल्याचे पदार्थ ही भारतीयांची खास ओळख आहे. भारतीय पदार्थांमध्ये मसाल्यांचा वापर जास्त प्रमाणात केला जातो. हे मसाले आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असतात. दालचिनी, काळी मिरी, जीरे यांसारखे मसाल्याचे पदार्थ मेटाबॉलिझम वाढवण्यासाठी आणि इन्शुलिनची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी फायदेशीर असतात. तसेच पचनक्रिया, सर्दी यांसारख्या हिवाळ्यातील तक्रारींवरही मसाल्याचे पदार्थ उपयुक्त ठरतात.

**३. ओली हळद :** थंडीच्या दिवसांत बाजारात आवर्जून दिसणारी गोष्ट म्हणजे ओली हळद. हळदीमध्ये करक्यूमिन नावाचे अँटीऑक्सिडंट आणि अँटी इन्फ्लमेटरी गुणधर्म असतात. हे घटक हृदयासाठी आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिशय उपयुक्त असतात. त्यामुळे या काळात ओल्या हळदीचा आहारात आवर्जून समावेश करायला हवा. या हळदीचे लोणचे अतिशय छान लागते तसेच ते ४ ते ६ महिने टिकते त्यामुळे आहारात त्याचा आवर्जून समावेश करावा.

**४. रताळी :** रताळी हे कंदमूळ आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असते. मेटाबॉलिझम वाढवण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो. यातील कार्बोहायड्रेटस आणि पोषक घटक शरीराला ऊर्जा मिळावी म्हणून फायदेशीर असतात.



# पोलादपूर नगरपंचायतीच्या विविध विकासकामांचा शुभारंभ

## मुख्यमंत्री शिंदे यांच्यामुळेच कामांची सुरुवात –आमदार गोगावले



**पोलादपूर : प्रतिनिधी**

आतापर्यंतच्या सर्वाधिक निधी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून नगरविकास खात्यातून आणण्यात यशस्वी झाल्यामुळेच पोलादपूर नगरपंचायतीच्या विविध प्रभागांमध्ये दणक्यात विविध विकासकामांचा शुभारंभ होऊ शकला, असा विश्वास आमदार भरत गोगावले यांनी येथे व्यक्त केला.

पोलादपूर नगरपंचायती हद्दीतील कोट्यवधींच्या विकासकामांचा शुभारंभ विकास गोगावले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, शहरप्रमुख सुरेश पवार, बांधकाम सभापती सिद्धेश शेठ, अर्थ व नियोजन सभापती मनोज प्रजापती, पाणीपुरवठा सभापती प्रसाद इंगवले, महिला व बालकल्याण सभापती अस्मिता पवार तसेच नगरसेविका सुनिता पार्टे, स्नेहा मेहता, शिल्पा दरेकर व नगरसेवक विनायक दिक्षित, भाजप नगरसेविका अंकिता निकम–जांभळेकर, मुख्याधिकारी विराज लबडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार गोगावले यांच्या हस्ते घंटागाडी, स्ट्रीटलाईट आणि गॅस शवदाहिनी या प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले. एक कोटी ९७ लाखांच्या प्रभात नगरमधील अंतर्गत गटारलाईन कामाचा शुभारंभ, सह्याद्री नगर चोळई नदीला संरक्षक भिंत, भैरवनाथ नगर सावित्री नदीला संरक्षक भिंत, पालकर ते सैनिकनगर गटारलाईन, प्रभाग क्रमांक१ सावंतकोंडमधील रस्त्याचे डांबरीकरण पार्ट १ आणि पार्ट २, प्रभाग क्रमांक १मध्ये पार्टेकोंड सभामंडप तसेच मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग ते गोकुळनगर रस्त्याचे डांबरीकरण आणि तीन ठिकाणी ड्रेनेजचे काम करणे आदी कामांची सुरुवात करण्यात आली.

शहरामध्ये ठिकठिकाणी युवासेना सचिव विकास गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त शहरवासियांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन अभिष्टचिंतन केले. या वेळी तालुकाप्रमुख निलेश अहिरे, शंकर दरेकर, माजी नगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, लक्ष्मण मोरे, युवासेना तालुकाप्रमुख संजय कळंबे उपस्थित होते.

# मध्य रेल्वेकडून लांबच्या मार्गावर धुके सुरक्षा यंत्राचा वापर

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने धुके सुरक्षा यंत्राचा वापर करून धुक्याच्या वातावरणात रेल्वेच्या सुरक्षेसाठीची उपाययोजना केली आहे. सिग्नल दृश्यमानता कमी असताना रेल्वेचालकांना मदत करण्याच्या उद्देशाने हे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान काम करते.

धुके सुरक्षा यंत्रणा हे यंत्र धुके जीपीएस तंत्रज्ञानावर चालते. जे रेल्वे चालकांना आगामी तीन सिग्नल्सबाबत ऑडिओ आणि व्हिज्युअल संकेतांद्वारे आगाऊ सूचना देते. हे उपकरण केवळ पुढील सिग्नलचे वर्णन दाखवत नाही तर इंजिन आणि सिग्नलमधील मध्यवर्ती अंतर देखील सूचित करते, तसेच आगामी बदलांसाठी योग्य तयारी सुनिश्चित करते. विविध चालक मार्गावरील सर्व सिग्नल्स आणि लेव्हल क्रॉसिंग गेट्स जीपीएस स्थानांद्वारे काळजीपूर्वक मॅप केले गेले आहेत आणि सर्वसमावेशक कव्हरेज सुनिश्चित करून डिव्हाईसमध्ये प्रोग्राम केले आहेत. वास्तविक स्थानाच्या ५०० मीटर आधी सिग्नलचे दिशा जाहीर करून रेल्वेचालकांना त्यांच्या गाड्या सुरक्षितपणे हाताळण्यासाठी अधिक सतर्क आणि अधिक सुसज्ज राहण्यास मदत करते. हे यंत्र उजव्या हाताच्या बाजूला स्थित धोक्याच्या सिग्नलवर विशेष लक्ष देते आणि सुरक्षा उपायांची माहिती देते. धुक्यामुळे कमी दृश्यमानतेच्या घटनांमध्ये, ट्रेनचा वेग सामान्यतः ३०–६० किमी प्रतितास दरम्यान असतो. तथापि, फॉग सेफ्टी डिव्हाईसच्या अंमलबजावणीमुळे जास्तीत जास्त ७५ किमी प्रतितास वेग मिळू शकतो. ज्यामुळे ट्रेनचा खोळंबा करणारा कालावधी कमी होतो आणि वक्तशीरपणा वाढतो.

धुके सुरक्षा यंत्राचे विभागनिहीय उपकरणामध्ये मुंबई विभाग १० उपकरणे, भुसावळ विभाग २४८ उपकरणे, नागपूर विभाग २२० उपकरणे, सोलापूर विभाग नऊ उपकरणे पुणे विभाग १० उपकरणे विविध विभागांमध्ये एकूण ४९७ उपकरणांच्या वितरणासह मध्यरेल्वेने विशेषत: प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीत रेल्वे परिचालनाची सुरक्षितता आणि कार्यक्षमतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुष्टी करते आहे. शिवाय संपूर्ण रेल्वे महाजालावर सुरक्षा उपाय आणि कार्यक्षमता अधिक मजबूत करण्यासाठी अतिरिक्त धुके सुरक्षा यंत्रणांची खरेदी सध्या रेल्वेकडून सुरू आहे.


।। सहकारातून समाजपरिवर्तन ।।

**श्री कुलस्वामी**

**को ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**

मुख्यालय : एफ ३/१, सेंट्रल बि., ए.पी.एम.सी. फ्रुट मार्केट, से.१९, वाशी, नवी मुंबई, संपर्क : २७८३१००७, २७८४०५३३/३४, फॅक्स: २७८३१०२७ शाखा: कामोठे जुही गार्डन हौ. सोसायटी, गाळा नं.०८, सेक्टर ०७, प्लॉट नं.०८, कामोठे, नवी मुंबई, ४१०२०९

**जाहीर नोटीस**

खालील नमुद केलेल्या कामोठे शाखेतील सोनेतारण कर्ज धारकांना कळविण्यात येते की, सोनेतारण कर्जदाराच्या नावा पुढे नमुद करण्यात आलेल्या सोनेतारण कर्जाची पुर्ण थकबाकी झालेली आहे. तरी संबंधितांना या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, आपण घेतलेल्या सोनेतारण कर्जाची पूर्ण थकबाकी झालेली आहे. संस्थेच्या संचालक मंडळ सभा क.११, दिनांक १९/१२/२०२३, ठराव क.१३ (४) नुसार तारण सोने मोडण्याचे ठरविले आहे. तरी संबंधितांना या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, आपण सोने तारण कर्जाची संपुर्ण येणे रक्कम ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासुन ७ दिवसांच्या आत भरणा करावा. जर आपण संस्थेकडून घेतलेल्या सोनेतारण कर्जाचा संपूर्ण भरणा केला नाही तर आपण संस्थेच्या कामोठे शाखेतुन सोनेतारण कर्ज घेताना तारण ठेवलेले सोने मोडण्यात येईल. त्या मोडलेल्या सोन्यातुन जी रक्कम संस्थेच्या शाखेकडे जमा होईल ती रक्कम सोनेतारण कर्ज खात्यात हस्तांतरित करण्यात येईल. उर्वरित रक्कम सोने तारण कर्ज धारकांच्या बचत खात्यावर जमा करण्यात येईल. परंतु सोने मोडुन सोने तारण कर्ज वसुल झाले नाहीतर आपल्यावर कायदेशीर कारवाई करुन तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे १०१ अन्वये कारवाई करून येणे रक्कम वसुल करण्यात येईल. सोनतारण कर्जदाराची माहिती खालील प्रमाणे...

| अ. क्र. | सोने तारण केस क्र. | कर्जदाराचे नाव | कर्जदाराचा पत्ता | येणे रक्कम रुपये दि.२६/१२/२३ अखेर |
|---|---|---|---|---|
| १ | ४१४ | श्री. विकास साहेवराव पाटील | राहण्याचा पत्ता : शॉप नं.०४, वेद सोसायटी, प्लॉट ३५, सेक्टर ३५, कामोठे, नवी मुंबई. ४१०२०९ गावचा पत्ता : मु.पो. डोंगरगाव, ता. सांगोला, जि. सोलापुर | ७०,७८८/– |
| २ | ४१९ | श्री. सचिन जनार्दन घुले | राहण्याचा पत्ता: रूम नं.१०४, गणपत पाटील चाळ, मु.चिलें, ता. उरण, जि. रायगड गावचा पत्ता : मु. तुकारामवाडी, पो. सावरगाव, ता. जुन्नर, जि. पुणे | ६,११३/– |
| ३ | ४२५ | संभाजी विठ्ठल गुंजाळकर | राहण्याचा पत्ता : रूम नं.१०१, साईतेज हौसिंग सोसायटी लि., प्लॉट १ ते ३, पनवेल, नवी मुंबई. ४१०२०६ गावचा पत्ता : मु.पो. मण्याची वाडी, मालदन, ता. पाटण, जि. सातारा | ५,६८,५७२/– |
| ४ | ४२६ | संभाजी विठ्ठल गुंजाळकर | राहण्याचा पत्ता : रूम नं.१०१, साईतेज हौसिंग सोसायटी लि., प्लॉट १ ते ३. पनवेल, नवी मुंबई, ४१०२०६ गावचा पत्ता : मु.पो. मण्याची वाडी, मालदन, ता. पाटण, जि. सातारा | २,७७,७१७/– |

तरी नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ७ दिवसांच्या आत सोने तारण कर्ज भरणा करावा अन्यथा तारण असलेले सोने मोडण्यात येईल याची दखल घ्यावी. तदनंतर कोणतेही म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

जा.क्र. ५०/२०२३–२४.
दिनांक–२६/१२/२०२३
ठिकाण: नवी मुंबई

सही/–
व्यवस्थापक
श्री कुलस्वामी को–ऑप क्रेडिट सोसा. लि करिता .,


# पर्यटकांना दुचाकी भाडेतत्वावर देणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाईची मागणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमध्ये गोव्याच्या धर्तीवर पर्यटकांना मोटरसायकल भाडेतत्त्वावर देण्याचे व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहेत. गोव्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी अशा व्यवसायाला परवानगी दिली असली तरी, राज्यात याबाबत कुठलेही धोरण अस्तित्वात नाही. त्यामुळे बेकायदेशीरपणे चालविण्यात येणाऱ्या या व्यवसायांवर कारवाई करा, अशी मागणी अलिबाग येथील ऑटो रिक्षा व्यावसायिक संघटनेनी केली आहे. पोलीस अधीक्षकांना याबाबतचे निवेदन देऊन त्यांनी हे व्यवसाय बंद करण्याची मागणी केली आहे.

पर्यटनस्थळ असलेल्या अलिबागमध्ये दुचाकी भाड्याने देण्याचा जोरात सुरू आहे. या व्यवसायाला परिवहन विभागाची कुठलीही परवानगी नसताना हा व्यवसाय चालवला जातो. रिक्षाचालकांच्या तक्रारी नंतर आरटीओने या व्यावसायिकांना नोटीसा बजावल्या असल्या तरीही हा व्यवसाय बिनदिक्कतपणे सुरू आहे. ज्यामुळे ऑटो रिक्षाचालकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. यासंदर्भात अलिबागमधील ऑटो रिक्षाचालकांनी एक दिवसाचा संपही पुकारला होता. अलिबाग पोलीस ठाण्यात जाऊन तत्कालीन पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्याकडे आपली कैफियत मांडली होती. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आठवडाभरात सर्व बेकायदा बाईक व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे आश्वासन पवार यांनी रिक्षाचालकांच्या शिष्टमंडळाला दिले होते. त्यानंतर रिक्षाचालकांनी आपले आंदोलन मागे घेतले होते, पण महिन्याभरात बाईक ऑन रेंट व्यवसायिकांना नोटीसा बजावण्यापलिकडे कुठलीच कारवाई झाली नाही.

अखेर ऑटो रिक्षा व्यावसायिक संघटनेच्या वतीने मंगळवारी (दि. २६) पोलीस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या वेळी ॲड. अजय उपाध्ये यांच्यासह संघटनेचे अध्यक्ष शंकर राऊत, प्रकाश म्हात्रे आदी उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयात नवजात बालकांकरिता टॉवेलवाटप

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग जिल्हा रुग्णालय येथे नवजात बालकांना टॉवेल वाटप जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते करण्यात आले.


या वेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी (घुगे), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, मेट्रन मॅडम भोपी, जिल्हा लेखा व्यव्यस्थापक संतोष पाटील, फायनान्स कम लॉजिस्टिक कंसल्टंट प्रथमेश मोकल, आरबीएसके डीपीएस सुनील चव्हाण, प्रसूती विभागातील इन्चार्ज सिस्टर, सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा रुग्णालयामध्ये प्रसुतीसाठी विविध ठिकाणावरून गरोदर माता येत असतात. प्रसुतीसाठी आलेल्या गरोदर माता या दूरवरून येत असल्यामुळे, येताना त्या कोणत्याही प्रकारचे कपडे, वस्त्र घेऊन येत नाहीत. नवजात बालकाला आरोग्याच्या दृष्टीने संसर्ग होण्याची शक्यता असते. या सर्व बाबींचा विचार करून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नवजात बालकांना मोफत टॉवेल वाटप करण्यात आले.

या उपक्रमाकरिता रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे यांच्या सीएसआर फंडामधून सहकार्य मिळणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, डापकु संजय माने यांनी केले.



# चौक परिसरातील मंदिरात दत्त जयंती साजरी



**चौक : प्रतिनिधी**

चौक परिसरातील दत्त मंदिरात आणि स्वामी समर्थ महाराज यांच्या मठात मंगळवारी (दि. २६) मोठ्या उत्साहाने दत्तजयंती साजरी करण्यात आली.

चौक येथील दत्तमंदिर, तुपगाव व चौक येथील स्वामी समर्थ महाराज मठात, वरोसे दत्तमंदिर, आसरेवाडी येथील दत्तमंदिर, नडोदे येथील मंदिरात, वणवे–निंबोडे येथील दत्तमंदिर, संतोष जंगम खालापूर, तानाजी भोसले यांच्या घरी दत्तजयंतीनिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रम उत्साहाने सुरू झाले असून सप्ताहाची उद्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# भुवनेश्वर दत्त मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील भुवनेश्वर येथील दत्तमंदिरात खारेपाटातील भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. दत्तमंदिराचे व्यवस्थापन व कार्यक्रमांचे आयोजन ॲड. बि. एस. पाटील यांच्या कुटुंबियांकडून करण्यात आले होते. दत्तजयंतीनिमित्त संगीत भजनाचे कार्यक्रम झाले.

श्री टाकादेवी प्रासादिक भजन मंडळ मांडवा तसेच श्री गजानन प्रासादिक भजन मंडळ माणकुले यांनी भजन सेवा केली. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महिलांना हळदी कुंकु व भेटवस्तू देण्यात आली.




**महावितरण**

**ई निविदा जाहीर सुचना**

खालील कामाकरीता नामांकित आणि पंजीकृत ठेकेदारांकडून ई. निविदा बोलविण्यात येत आहे. निविदेचा तपशील खाली देण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचा तपशील | निविदा रक्कम / निविदा अनामत / निविदा मुल्य | निविदा विक्री / खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | काअ/पनवेल ग्रा./तां./ निविदा१७/ २०२३-२४ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोअर मधुन प्राप्त झालेले मटेरियल आणि इक्विपमेंट ९ मिटर टन पर्यंत ट्रान्स्पोटेशन व मटेरियल हँडलिंग करणे बाबतचा ठेका. | रु. १०.०० लाख रु.१०,०००/- रु. ११८०/- | दि.२६.१२.२०२३ पासुन दि.०८.०१.२०२४ पर्यंत |
| २ | काअ/पनवेल ग्रा./तां./ निविदा १८/ २०२३-२४ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत २२/३३ केव्ही मिटरींग टाईप करंट ट्रान्सफॉर्मर, पोटेंशिअल ट्रान्सफॉर्मर आणि सबस्टेशन टाईप करंट ट्रान्सफॉर्मर पोटेंशिअल ट्रान्सफॉर्मर दुरूस्त करणेबाबतचा ठेका. | रु. ०७.०० लाख रु. ७,०००/- रु. ११८०/- | दि.२६.१२.२०२३ पासुन दि.०८.०१.२०२४ पर्यंत |

सदर निविदा https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर दि.२६.१२.२०२३पासुन दि.०८.०१.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. अधिक माहिती साठी कार्यकारी अभियंता, पनवेल (ग्रा) विभाग या विभागाशी संपर्क साधावा. संपर्क क्र. कोमल भाकरे मो.नं.९०२९१६२७८१

कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या. पनवेल (ग्रा) विभाग



**पनवेल महानगरपालिका**

**ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६**

कार्यालय :– उपायुक्त मुख्यालय, १ ला मजला,
देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,पनवेल – ४१० २०६.
दूरध्वनी क्र. ०२२–२७४५८०४०/४१/४२
Email Id: panvelcorporation@gmail.com Website: www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/उपायुक्त/१७१६/२०२३ दिनांक :– २६ /१२/२०२३

**निविदा दरपत्रक सुचना**

**विषय :– शासन आपल्या दारी २०२३ अभियानांतर्गत शासनाच्या धोरणानुसार विशेष कार्यक्रमांतर्गत सांस्कृतीक व लोककलेचे सादरीकरण करणे बाबतची निविदा दरपत्रके मागविणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी सन २०२३ अभियानांतर्गत शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना थेट मदत तसेच विविध शासकीय योजनांच्या माहितीचा विस्तृत प्रमाणावर प्रसार व प्रचार करण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार विषेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

त्यानुसार सदर मुख्य कार्यक्रम हा दि.०५ जानेवारी २०१४ रोजी लोणेर, ता. माणगाव या ठिकाणी आयोजीत करण्यात येणार आहे, सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी महाराष्ट्राची संस्कृती व लोककलेचे सादरीकरण करणेकरीता विविध संस्थाकडून निविदा मागविणेत येत आहेत. इच्छुक निविदा धारकांनी आपली निविदा दरपत्रके दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागात सादर करावयाची आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | **शासन आपल्या दारी २०२३ अभियानांतर्गत शासनाच्या धोरणानुसार विशेष कार्यक्रमांतर्गत सांस्कृतीक व लोककलेचे सादरीकरण करणे बाबतची निविदा दरपत्रके.** | |

सदरची निविदा दरपत्रके दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. उपाआयुक्त, पमपा यांचे दालनात उपस्थित दरपत्रक धारक यांचे समोर उघडण्यात येतील.

१. उशिरा आलेल्या निविदा दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. दरपत्रकात नमूद केलेले दर हे सर्व प्रकारचे करांसह समाविष्ट असावे.
३. कोणतेही निविदा दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पनवेल महानगरपालिका प्रशासनाने राखून ठेवलेले आहे.

सही/
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पनवेल महानगरपालिका

# नवी मुंबईत अनधिकृत स्टॉल वाढले

## स्टॉलधारक थेट पदपथावर ■ पालिकेकडे कारवाईची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पालिकेकडून दिव्यांग नागरिकांना स्वयंरोजगार मिळावा या उदात्त हेतुने त्यांना विनामूल्य स्टॉल वितरित केले जाते, परंतु नवी मुंबईत अनधिकृत स्टॉल मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. पालिकेने या स्टॉलवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

महापालिकेकडून यशस्वी ३३० दिव्यांग घटकांना स्टॉल वितरित करण्यात येत आहेत. त्यासाठी पालिकेने सिडकोकडून ऐरोली ते बेलापूर दरम्यान १४ भूखंड विकत घेतले आहेत. या ठिकाणी दिव्यांग नागरिकांना स्टॉल व्यवसाय करण्यासाठी दिले जातात. स्टॉलचे वितरण मोक्याच्या ठिकाणी करण्यात येते. पादचाऱ्यांना त्रास होऊ नये अशा जागेची यासाठी निवड केली जाते, परंतु पालिकेच्या स्टॉल पेक्षा अनधिकृत स्टॉलचा भरणा शहरात अधिक आहे.





(प्रातिनिधिक छायाचित्र)

पालिकेने पहिल्यांदा वितरित केलेले स्टॉल हे पिवळ्या रंगाचे आहेत. तर शहरातील काही भागात पदपथ, मोकळ्या जागेवर असलेले स्टॉल हे निळ्या रंगाचे आहेत. त्यावर पालिकेकडून सर्व्हे केल्याचा क्रमांकदेखील प्रसिद्ध केला आहे. त्या अनुषंगाने खरोखरच पालिकेने निळ्या रंगाचे स्टॉल वितरित केले आहेत का, असा सवाल केला जात आहे.

> **पालिकेने निर्गमित केलेले स्टॉल पिवळ्या रंगाचे आहेत. पालिकेच्या हद्दीत निळ्या रंगाचे स्टॉल दिसून येत आहेत. त्या विषयी चौकशी केली जाईल. त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.**
> **–अशोक अहिरे, व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, नवी मुंबई पालिका**


## निवडक

### नेरूळमध्ये ग्रंथ पारायण, पालखी सोहळा

**नवी मुंबई :** दरवर्षीप्रमाणे यदाही संत गजानन महाराज सेवा मंडळ नेरूळ नवी मुंबई यांच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुदायिक पारायण व पालखी सोहळा आयोजन करण्यात आले आहे. पुणे येथील व्यासपीठ वाचक बाल पारायणकार सुरभी ढगे यांच्या मुखोदगत वाणीतुन रविवार ३१ डिसेंबर २०२३ रोजी नेरूळ सेक्टर १८ येथील जलकिरन हाऊसिंग सोसायटी येथे पारायण सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत पालखी सोहळा, दुपारी ४ ते सायं ६पर्यंत महाप्रसाद, साय ७ ते रात्री ९पर्यंत मंडळाचे हे ७ वे वर्ष असून सर्व भाविक भक्तांनी सामुदायिक पारायणाचा, पालखी सोहळा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय वाव्हाळ यांनी केले आहे.

### कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार ९ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे तहसीलदार, (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.



**उरण : सेंट मेरी हायस्कूल येथे बाळ येशूच्या जन्माचा देखावा साकारला आहे. फादर मार्शल लोपीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा देखावा सादर करण्यात आला आहे.**

## पारगाव येथे आज निधी आपके निकट उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

निधी आपके निश्चत २.०' भविष्य निर्वाह निधीचे सदस्य, नव्याने अंतर्भूत असलेल्या संस्था आणि पेन्शनधारकांसाठी सुरू आहे.यावेळी, पीएफ खातेदार, नवीन समाविष्ट संस्था आणि पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी त्यांच्या अंतर्गत एका ठिकाणी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, पारगाव येथे बुधवारी (दि. २७) बैठक आयोजित केली आहे. याशिवाय, अंबुजा सिमेंट लिमिटेड, उलवा रेती बंदर, मोहा गावाजवळ, पनवेल येथे एक जनजागृती शिबिरही आयोजित केले आहे.

या महिन्याच्या २७ तारखेला 'निधी आपके निकल २.०' या कार्यक्रमात खातेदारांना त्यांच्या कामासाठी क्षेत्रीय कार्यालय, वाशी येथे यावे लागू नये यासाठी पीएफ, नव्याने समाविष्ट संस्था आणि निवृत्तीवेतन संबंधित तक्रारी ऐकून घेतल्या जातील. याशिवाय, नवीन समाविष्ट आस्थापनांच्या नियोक्त्यांना पीएफ संबंधित मार्गदर्शन देखील प्रदान केले जाईल. जे.पी. चौहान, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त म्हणाले की, सध्या निधी आपके निश्वतची व्याप्ती वाढवण्याच्या प्रक्रियेत, 'निधी आपके निकल २.०' आणले आहे.

या कार्यक्रमात नोडल अधिकाऱ्याकडून समस्या ऐकून घेऊन त्याचे निराकरण केले जाईल.

## काळाच्या ओघात मराठी भाषा मरणार नाही –डॉ. शोभणे

**नवी मुंबई : बातमीदार**

काळाच्या ओघात मराठी भाषा मरणार नाही तर टिकून राहील. आजची मराठी भाषा ही वेगवेगळ्या परिवर्तनातून आली असून विविध भाषांतील नाना शब्दबंध, रूपे आपण मराठी भाषेत सहज सामावून घेतली. हे मराठी भाषा आणि संस्कृतीवर अतिक्रमण नाही तर हा मराठी भाषेचा विकास आहे, अशा शब्दांत मनोगत व्यक्त करीत नियोजित ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी बदल होत असतात, ते स्वीकारत राहिले पाहिजे आणि खुल्या मनाने भाषा व साहित्याकडे पाहिले पाहिजे, असे सांगितले.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने ग्रंथालीच्या ४९ व्या वाचक दिनाचे औचित्य साधून वाशी येथील मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळाच्या साहित्य मंदिरात संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या नागरी सत्काराप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते.



नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी वाचनप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांच्या वतीने, नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून, डॉ. रवींद्र शोभणे यांना शाल, सन्मानचिन्हे, ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती व ग्रंथभेट देऊन पत्नी अरुणा शोभणे यांच्यासह सन्मानीत केले. या वेळी ग्रंथालीचे मुख्य विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी, लेखिका डॉ. निर्मोही फडके, ग्रंथालीच्या कार्यक्रम संयोजक धनश्री धारप, संपादक अरुण जोशी, विश्वस्त आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते डॉ. रवींद्र शोभणे लिखित 'शहामृग' या कथासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे ग्रंथालीच्या वतीने प्रकाशन करण्यात आले. शहर स्वच्छतेइतकेच मनाच्या स्वच्छतेकडेही नवी मुंबई महानगरपालिका लक्ष देत असून त्यादृष्टीने वाचन संस्कृती जोपासण्यासाठी समृद्ध ग्रंथालय उभारणीवर व त्याला अनुरूप नानाविध उपक्रम राबविण्यावर महापालिका भर देत असल्याची माहिती आयुक्तांनी या वेळी दिली.

नवी मुंबई महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे यांनी कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन केले. मराठी साहित्य, संस्कृती व कला मंडळाचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी यांनी आभार मानले.

## चिरनेर कातळपाडा येथे दत्तगुरूंची ग्रामप्रदक्षिणा दिंडी



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे सालाबादप्रमाणे दत्तजयंतीनिमित्त पूर्वसंध्येला दत्तगुरूंची ग्रामप्रदक्षिणा दिंडी भिकक्षेच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

यंदा या दत्तजयंतीचे २६वे वर्ष असून येथील शेकडो ग्रामस्थ आणि महिला भगिनी या दिंडीमध्ये सहभागी होत आहेत. दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या जयघोषने सारा परिसर दुमदूमला होता. गावात ठिकठिकाणी दत्तगुरूंच्या प्रतिमेचे औक्षण करतांना महिला भगिनी दिसत होत्या.

याचप्रमाणे दत्त जयंतीनिमित्त कातळपाडा येथील येथील दत्तमंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने संपूर्ण कातळपाडा येथे महिला वर्गाकडून रांगोळी काढण्यात आल्या तर मुक्त सांप्रदाय अध्यात्मिक पौर्णिमा मंडळ, केळवणे यांच्या दिंडी भजनासोबत दत्त गुरूंच्या प्रतिमेची ग्राम प्रदक्षिणा करण्यात आली.




**नवी मुंबई : भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयात प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार आणि अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अटलजींच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.**

## मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांकडून पनवेल स्थानकाची पाहणी

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल हार्बर मार्गावरील उपनगरीय लोकल ट्रेनच्या मोटरमन कॅबमध्ये फूटप्लेसची तपासणी केली आणि पुढे पनवेल ते ठाणे या मार्गावरील मागील भागाच्या खिडकीची तपासणी केली.



महाव्यवस्थापक राम करण यादव यांनी ट्रॅक, सिग्नलिंग, ओव्हर हेड इक्विपमेंटच्या विविध सुरक्षा पैलूंचीसुद्धा तपासणी त्यांनी केली. या वेळी प्लॅटफॉर्मचा स्लोप काढणे, प्लॅटफॉर्मच्या टोकांना सुरक्षा जाळी बसवणे व अवैध पद्धतीने होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी प्लॅटफॉर्मच्या टोकांवर ग्रीस लावणे तसेच ट्रॅकवरील चिखल काढणे आणि इतर उपाययोजनांच्या विविध बाबींवर त्यांनी लक्ष दिले. पनवेल स्थानक यार्डमधून जाणाऱ्या आगामी डेडिकेटेड मालवाहतूक विशेष मार्गाच्या कामाचीही त्यांनी पाहणी केली.

## नवी मुंबईत सोलर हायमास्टला प्राधान्य; वाशी विभागाला निधी

**नवी मुंबई : बातमीदार**



देशात सौर ऊर्जेला चालना मिळावी यासाठी केंद्र शासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. त्यास उत्तम प्रतिसाददेखील मिळत आहे. त्याच अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई पालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी तसेच महिलांच्या संरक्षणाकरिता विशेष तरतूद या योजनेंतर्गत नवी मुंबई पालिका क्षेत्रात आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नाने सोलर हायमास्टकरिता रक्कम २५ कोटी रुपये इतका भरघोस निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे सोलर हायमास्ट व सौर पथदिवे बसविणे हे आपल्या नवी मुंबई पालिका क्षेत्रात बसवले जाणार असून वाशी विभागामध्ये लख्खप्रकाश मिळणार आहे.

वाशीमध्ये दत्तगुरु सोसायटी आहे. या सोसायटीमध्ये सर्व सामान्य नागरिक राहतात आणि त्यांच्या महिलांच्या सुरक्षाकरिता आपण सोलर हायमास्ट देत आहे. रात्रपाळीस कामावर जाण्याकरिता विशेषत: महिलांना व कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच रात्रीअपरात्री सीसीटीव्ही कॅमेरांना प्रकाश नसल्याकारणाने पोलीसांना फुटेज शोधण्यास नाहक त्रास होत असतो. आता प्रत्येक विभागामध्ये पाच पाच सोलर हायमास्ट लावत असल्याने चैन स्नेचिंग, महिलेची छेडछाड या अशा विविध गुन्ह्यावर आळा बसणार आहे.

या वेळी विकास सोरटे, मुकुंद विश्वासराव, वसारामजी राजपूत, प्रताप बोसकर, रामकृष्ण अय्यर, गणेश शिंदे, महेश दरेकर, प्रवीण भगत, राजेश आहिरे, मधुकर शिंदे, विक्रम सुतार, रत्ना विश्वासराव, प्रमिला खडसे, मालती सोनी, मीना कुटे, रिना राय आदी भाजप पदाधिकारी व सोसायतील पदाधिकारी उपस्थित होते.

> **वीजबिलात होणार बचत**
> सोलारमुळे परिसर उजळून निघणार असल्याने पालिकेच्या वीजबिलात बचत होणार आहे. सध्या पालिका पदपथ दिव्यांसाठी कोट्यवधी बिल मोजत समाहे. अशात सोलर दिव्यांमुळे लख्ख प्रकाश मिळणार असून विजेपोटी जाणारे लाखो रुपये वाचणार आहेत.

## अंबानी हॉस्पिटलमध्ये कठीण शस्त्रक्रिया यशस्वी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईने दोन दुर्मीळ केसेसची माहिती दिली आहे, ज्यामध्ये गिळताना त्रास होण्याच्या समस्येवर आधुनिक पेरोरल एंडोस्कोपिक मायोटॉमी प्रक्रियेचा उपयोग करून यशस्वीपणे उपचार केले गेले.

यापैकी एक ४१ वर्षांचे श्री अशोक यांना गेल्या दहा वर्षांपासून जेवताना छातीमध्ये त्रास होत होता. दुसरी केस श्रीमती सिराज देवी या ७० वर्षांच्या महिलेला गेल्या पाच वर्षांपासून गिळताना त्रास होत होता, खूप जुना खोकला होता, सतत होणाऱ्या एस्पिरेशन न्यूमोनियामुळे फुफ्फुसांचे फायब्रोसिस झाले होते. अन्ननलिकेवर परिणाम करणारी एक स्थिती, कलेसिया कार्डियाचे निदान करण्यात आल्यावर रुग्णांवर खूपच कमी इन्व्हेसिव्ह असलेली पीओईएम प्रक्रिया करण्यात आली. त्यामुळे लक्षणांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा दिसून आली. तिसऱ्या दिवशी त्यांना घरी पाठवण्यात आले. मल्टीडिसिप्लिनरी दृष्टिकोनामुळे या दोन्ही रुग्णांना बरे होण्यात मदत मिळाल्याचे या दोन्ही केसेसमधून दिसून येते.



## बिलिवर्स ईस्टर्न चर्चमध्ये नाताळ सण उत्साहात साजरा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बिलिवर्स ईस्टर्न चर्च डॉयोसिसमध्ये नाताळ सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सणानिमित्त कॉम्पच्या परिसरामध्ये पदयात्रा काढण्यात आली. बिशप मार्टिन मोर एप्रेम, फादर संकेत मशिह, फादर तीमोथी, फादर प्रभाकर यांनी नाताळच्या प्रार्थना विधीला संपन्न केले.

बिशप मार्टिन मोर एप्रेम यांनी सर्वांना नाताळ सनाच्या शुभेच्या आणि आशिर्वाद दिला आणि मंडळीसाठी प्रार्थना केली तसेच त्यांनी आपल्या संदेशामध्ये ख्रिस्ती बांधवांना संबोधून म्हटले की, प्रभू येशु ख्रिस्ताचा जन्म जगाचा इतिहासातील सर्वांत मोठी ब्राह्मण्डनीय घटना होती. येशू ख्रिस्ताने सामान्य माणसाच्या आयुष्याला नवे आणि आध्यात्मिक वळण दिले. येशूंनी दिलेला मार्ग प्रेम आणि पवित्रतेवर आधारित होता त्यांच्या या संदेशामुळे जगात एक नवी पहाट निर्माण झाली.

ज्या काळात ईश्वराचा शोध किंवा उच्च आध्यात्मिक जीवनाचा ध्यास ही ध्येय परंपरा मिटली होती त्या काळात येशू ख्रिस्ताचा जन्म झाला.

## वृक्षप्रेमी आबा रणवरे यांना पुरस्कार प्रदान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

छावा प्रतिष्ठान छावा शिवकालीन बहुउद्देशीय कलामंच यांच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय पुरस्कार–२०२३ आणि इंडियन नॅशनल पुरस्कार २०२३चा वितरण सोहळा वाशी येथील साहित्य मंदिर सभागृहात झाला. या वेळी भाजपचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष संदीप नाईक यांच्या हस्ते आबा विठ्ठल रनवरे यांना समाजरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तसेच त्यांनी छावा प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमाला वैभव नाईक, सुभेदार कुणाल मालुसरे, मुरलीधर पेटकर, ए सी पी राज खतीब, आरपीएफ चे आय जी यश मिश्रा, एपीआय विजय राऊत, ग्रँड मास्टर किंम योग हो, मास्टर चोन जिहूम, अभिनेता सभाजी माने, बलराज माने आदी उपस्थित होते. या वेळी वृक्षप्रेमी पर्यावरणवादी आबा विठ्ठल रणवरे यांना छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. शाहीर वैभव घरत यांनी पोवाडा सादर केला.

## राज्य व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धा

# नागपूर, मुंबई संघ विजेते



**बदलापूर : प्रतिनिधी**

वरिष्ठ गटाच्या ५४व्या महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धेत महिला गटात नागपूर संघाने पुणे संघाला नमवत अजिंक्यपदावर आपले नाव कोरले, तर पुरुष गटात मुंबई संघाने नागपूरच्या संघाला पराभूत करीत अजिंक्यपद मिळविले.

अविष्कार सांस्कृतिक व क्रीडा मंडळ तसेच व्हॉलीबॉल असोसिएशन ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही स्पर्धा बदलापूर पश्चिमेतील बदलापूर जिमखाना येथे रंगली. गेल्या ५४ वर्षांच्या इतिहासात मुंबई महानगर प्रदेशात पहिल्यांदाच या स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान ठाणे जिल्ह्याला आणि बदलापूर शहराला मिळाला.

स्पर्धेचे उद्घाटन मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे तसेच आयोजक आणि ठाणे व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष किरण भोईर यांच्या हस्ते पार झाले. या स्पर्धेत राज्यभरातील ३४ जिल्हा संघांनी आपला सहभाग नोंदवला. पुरुष आणि महिला अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत एकूण ९०० खेळाडूंनी सहभाग घेतला. सर्व फेऱ्या पार करीत महिला गटात पुणे आणि नागपूर यांच्या अंतिम सामना रंगला. त्यात नागपूर संघाने ३-२ अशा डावात पुणे संघाचा पराभव केला, तर पुरुष गटात नागपूर आणि मुंबई यांच्यात अंतिम लढत झाली. यात मुंबईने सुरुवातीपासून सामन्यावर पकड ठेवत ३-१ असा दणदणीत विजय मिळवला.

चार दिवस चाललेल्या या स्पर्धेत राज्यभरातून प्रेक्षकांनी हजेरी लावली होती. अंतिम सामन्यासाठी तर क्रीडाप्रेमींनी तुफान गर्दी केली होती. या स्पर्धेदरम्यान विविध खेळांमध्ये शिछत्रपती पुरस्कार विजेत्या ज्येष्ठ आणि तरुण खेळांडूंना गौरवण्यात आले. खेळाप्रती जनजागृती निर्माण व्हावी यासाठी शहरात फेरी काढण्यात आली होती.




## सोनखार स्पोर्ट्स फेस्टिव्हलचे पारितोषिक वितरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते श्री. दशरथ भगत व सामाजिक कार्यकर्ते संदीप भगत तसेच माजी नगरसेविका वैजयंती भगत यांच्या माध्यामतून सोनखार स्पोर्ट्स फेस्टिव्हल सानपाडा येथे आयोजित करण्यात आला होता. याचा बक्षीस वितरण समारंभ गुनिना मैदानावर झाला.

क्रिकेट, बॅडमिंटन, फुटबॉल, बुद्धिबळ, मिनी मॅरथॉन, बुद्धिबळ, कॅरम, सायकलोथोन, व्हॉलीबॉल, योगा, स्केटिंग, बास्केटबॉल, एअर रायफल, अर्चेरी अशा इनडोअर आणि आउटडोअर खेळांचे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रभागातील लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिक व महिला अशा ३५००हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला.

पारितोषिक वितरण समारंभातही मनोरंजन, शरीरसौष्ठव, डॉग शो, दिनदर्शिका लोकार्पण, जिम्नॅस्टिक तसेच लकी ड्रॉ असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. त्याचप्रमाणे सामाजिक उपक्रम म्हणून जव्हार मोखाडा येथील रयत शिक्षण संस्थेच्या आदिवासी आश्रमशाळेला चार संगणक भेट देण्यात आले.

या सोहळयास प्रामुख्याने सुरज हॉस्पिटलचे डॉ. उदय पाटील यांच्यासह सानपाडा पाम बीच येथील विविध सोसायट्यांचे पदाधिकारी, सदस्य, रहिवासी उपस्थित होते.

## रायगडचा सबज्युनियर क्रिकेट संघ कोल्हापूरला रवाना

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील (सबज्युनियर) मुलांच्या क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा संघ कोल्हापूरला रवाना झाला.

उरण तालुक्यातील भेंडखळ येथील ठाणकेश्वर मैदानावर रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे १४ वर्षांखालील (सबज्युनियर) मुलांची निवड चाचणी घेण्यात आली होती. यात २१६ खेळाडू सहभागी झाले होते. त्यातील ४५ खेळाडूंची निवड करण्यात आली. त्यांचे तीन संघ तयार करून त्यांच्यात रिलायन्स इंडस्ट्रीच्या नागोठणे येथील मैदानावर साखळी सामने खेळविण्यात आले. या सामन्यांमधील कामगिरी पाहून रायगडचा संघ निवडण्यात आला. चंद्रकांत चौधरी, ऋषिकेश राऊत, अभिषेक खातू यांच्या निवड समितीने संघ निवडला.

स्पर्धा व्यवस्थापक म्हणून प्रकाश पावसकर यांनी, तर समन्वयक म्हणून संदीप पाटील यांनी काम पाहिले. या वेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, रिलायन्स स्पोर्ट्स सेक्रेटरी उदय दिवेकर, विश्वनाथ उतेकर, प्रतिम कैय्या उपस्थित होते.

दरम्यान, रायगड जिल्ह्याच्या युवराज चौधरी, पार्थ म्हात्रे, तनिष पुजारी यांची पश्चिम विभीय संघासाठी निवड करण्यात आली आहे.

रायगडचा संघ : पंकज इटकर (कर्णधार), अथर्व पाटील (उपकर्णधार), तनिष्क जातुशकरण, आन्हिक मानकामे, आर्यन निकाळजे, अविघ्न गुंड, आशिर्व पाटील, पार्थ पवार (यष्टीरक्षक), साहिल पोपेटा, वेदांत कडू, सोहराब अन्सारी, आदित्य भारती, अजिंक्य कैय्या, भाविक पाटील; राखीव : त्रिशांत सिंग, युवराज खिल्लारे, ओम सावंत, रिदम पाटील, मंत्र पाटील, अदिल हनुमंते, आयुष पाटील, पृथ्वीराज जवके. प्रशिक्षक व व्यवस्थापक : राहुल नवखारकर.

## पहिल्या कसोटीत जडेजाच्या जागी अश्विनला संधी

**सेंच्युरियन : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेला मंगळवार (दि.२७) पासून सुरुवात झाली. पहिल्या कसोटीत भारतीय संघात अनेक बदल पहायला मिळाले. अष्टपैलू रवींद्र जडेजा पहिली कसोटी खेळत नाहीय. त्याच्या जागी आर. अश्विनला संधी मिळाली आहे.

जडेजाच्या पाठीत दुखापत झाली होती. त्यामुळे त्याच्या जागी अश्विनचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूर, मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराहही खेळत आहेत. त्याचवेळी प्रसिध कृष्णाने पदार्पण केले आहे.

## ‘कमळ’च्या क्रिकेट स्पर्धेत रायडर्सने मारली बाजी



**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या कमळ नागरी सहकारी पतसंस्था कर्मचारी क्रिकेट स्पर्धेत कमळ रायडर्स या संघाने विजेतेपद पटकावले. कमळ स्ट्रायकर्स या संघ उपविजेता ठरला. विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात आले.

अलिबाग नेहुली येथील रायगड जिल्हा क्रीडासंकुलाच्या मैदानावर रविवारी (दि.२४) ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे उद्घाटन कमळ नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष सतिशचंद्र पाटील यांच्या हस्ते झाले. संस्थेच्या १५ शाखा व प्रधान कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

या वेळी कमळ नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष सतिशचंद्र पाटील, संस्थापक अध्यक्ष गिरीष तुळपुळे, उपाध्यक्ष नंदकुमार चाळके, संचालक आनंद करंबत, श्रीनिवास पाटील, ललित भिसे, कौस्तुभ कुलकर्णी, लक्ष्मण जुंधारे, प्रदीप जोशी यांच्या उपस्थित पारितोषिक वितरण करण्यात आले. संस्थेचे संचालक संतोष पुरव यांनी समालोचन केले. कमळ पतसंस्थेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेचा मानकरी व सामनावीर म्हणून मनेष भोनकर, उत्कृष्ट फलंदाज म्हणून गणेश लदगे, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून पुष्कर आठवले यांची निवड करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## ‘झुंझार’च्या क्रिकेट स्पर्धेत माणगाव संघ विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे झुंझार युवक मंडळ आयोजित कै. मिलिंद रवींद्र चवरकर स्मृतीचषक एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यात



फायटर्स क्रिकेट अकॅडमी माणगाव संघाने लावास क्रिकेट क्लब पनवेल संघावर विजय मिळवला.

नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या माणगाव संघाने ३५.२ षटकांमध्ये सर्व गडी बाद १५१ धावसंख्या उभारली. अजय जाधवने मधल्या फळीत सर्वाधिक ४५ धावा केल्या. ऋग्वेद जाधव व निल जाधव यांनी प्रत्येकी १५ धावांचे संघाला योगदान दिले. पनवेल संघाकडून वेध वयाल याने चार, तर अनुराग कुलकर्णी, हार्दिक जाधव, आयुष पाटील यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले.

धावांचा पाठलाग करताना पनवेल संघाचा डाव २९व्या षटकात ७५ धावांवर आटोपला. वेध वयालने सर्वाधिक १३ धावा केल्या. माणगाव संघाकडून पार्थ म्हस्के याने चार, निधीश मेहताने तीन व तनिष्क टेमकरने दोन फलंदाज बाद केले.

अजय जाधव याला सामनावीर, वेध वयाल स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू, पार्थ म्हस्के इमर्जिंग प्लेअर, आकाश चौधरी व हार्दिक जाधव यांना उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून ‘झुंझार’चे किशोर तावडे, सागर कांबळे, रोहित काळे, संकेश ढोले, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



(छायाचित्र : जयवंत माडपे)

## खोपोलीतील कराटेपटूंचा राज्यस्तरीय स्पर्धेत डंका

**खोपोली : प्रतिनिधी**

२३वी राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप कराटे स्पर्धा नुकतीच मुंबईतील माहीम येथे झाली. या स्पर्धेत खोपोलीतील शतोकोन कराटे स्पोर्ट अकॅडमीतील खेळाडूंनी ६४ सुवर्ण, ३० रौप्य व २६ कांस्य मिळून एकूण १२० पदके पदके पटकावली.

यशस्वी खेळाडूंना शतोकोन कराटे स्पोर्ट्स अकॅडमीच्या व्यवस्थापक पाच वेळा ब्लॅकबेल्ट प्राप्त शितल गायकवाड, मास्टर विशाल गायकवाड, योगेश गायकवाड, विनया केदार मुंडे यांचे मार्गदर्शन मिळाले. सर्व खेळाडूंचे खोपोलीत जोरदार स्वागत करण्यात आले.

## उरण एनआय शाळेत क्रीडा महोत्सव उत्साहात



(छाया : दिनेश पवार)

**उरण : वार्ताहर**

उरण येथील एनआय शाळेचा तीनदिवसीय क्रीडा महोत्सव उत्साहात झाला. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी सहभाग घेत खेळांचा आनंद लुटला.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक एल.एम. भोये, पर्यवेक्षिका पेंडसे, प्रभारी पर्यवेक्षक एस.जे. कांबळे, सहशालेय प्रमुख डी.सी. म्हात्रे, शालेय समितीचे चेअरमन सदानंद गायकवाड, माजी नगरसेवक राजेश ठाकूर यांच्या हस्ते झाले

या शाळेचे माजी विद्यार्थी असलेल्या राजेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना खेळ व अभ्यासाचे महत्त्व सांगून शाळेतील आठवणी, त्यांना शिकवणारे शिक्षक यांचा भाषणात उल्लेख केला. या वेळी त्यांनी शाळेला रोख रक्कम देऊन सहकार्य केले .

शाळेचे चेअरमन सदानंद गायकवाड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक भोये यांनी विद्यार्थ्यांना खेळाची शपथ दिली. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी यश मिळवावे, यासाठी स्पर्धा घेतली गेली.

## स्क्वॉशपटू दुर्गा पारधीची राष्ट्रीय पातळीवर निवड

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदिरची विद्यार्थिनी दुर्गा



हिरू पारधी हिने पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्क्वॉश स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. दुर्गाची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे.

महाराष्ट्र स्टेट स्क्वॉश कोर्ट उंड्री पुणे येथे झालेल्या १७ वर्षांखालील मुलींच्या गटात दुर्गा पारधीने मुंबई विभागाचे नेतृत्व केले. अंतिम सामन्यात जॉन कोन्नन स्कूल मुंबई शहरच्या खेळाडूकडून दुर्गाचा निसटता पराभव झाला. राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याने दुर्गाची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे.

दुर्गाला स्टार्ट अकॅडमीचे रित्विक भट्टाचार्य व बिजली दरोडा यांचे मार्गदर्शन तसेच स्वामी विवेकानंद विद्यामंदिरचे क्रीडा शिक्षक सतिश राणे, श्रीकांत कोकणी आणि सर्व शिक्षकवर्गाचे प्रोत्साहन मिळत आहे.

## विजय आर्मी स्कूल येथे क्रीडा स्पर्धा रंगली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कै. रुख्मिणीताई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ चिखले येथील विजय आर्मी स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद लाभला.

उद्घाटन समारंभात कमांडर पीव्हीआर कृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण व रुख्मिणीताईंच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य एम.के. मराठे, उपप्राचार्य एस.पी. पाटील, पर्यवेक्षक एन.एल. पाटील, पर्यवेक्षक ए.डी. अहिरे, सैनिक निर्देशक पी.एस. पाटील व क्रीडा शिक्षक डी.टी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मॅरेथॉनला कमांडर कृष्णन व प्राचार्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

स्पर्धेवेळी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सैनिकी निर्देशक, संगणक निर्देशक, लॅब असिस्टंट यांची उपस्थिती होती. खेळीमेळीच्या वातावरणात व्हॉलिबॉल, टग ऑफ वॉर, स्विमिंग, रायफल शूटिंग, स्किपिंग रोप, शॉट पुट, बुद्धिबळ, कबड्डी, क्रिकेट, धावणे इत्यादी स्पर्धा झाल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com